# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### मिहान (नागपूर)येथील कार्यरत कंपन्यामध्ये लाइव्ह ॲप विकसीत करण्याबाबत

**(१) ५११ (२७-०४-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मिहानमध्ये गुंतवणूक वाढावी तसेच गुंतवणूक करण्यास इच्छुक असलेल्या कंपन्याना विलंब होऊ नये याकरिता दीड वर्षाआधीच "एमएडीसी" च्या सहव्यवस्थापकीय संचालकपदाची जबाबदारी सोपविण्यात आलेले डॉ. विपीन इटनकर, जिल्हाधिकारी यांनी एक लाइव्ह ॲप सुरु करण्याची घोषणा करुनही संबंधित प्रशासनाने अद्यापपर्यंत ॲप विकसीत केले नसल्याचे एमएडीसीची वेबसाईटही अपटेड केले नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ॲप विकसीत केले नसल्याने मिहान येथील कार्यरत कंपन्या आणि जागा अडवून ठेवलेल्या कंपन्याची नांवे वेबसाईटवर जाहीर करण्यात आलेली नसल्याने मिहान प्रकल्पाचा विकास आणि रोजगाराची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचत नसल्याने इच्छूक उद्योजकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मिहान येथील कंपन्यामध्ये लाइव्ह ॲप विकसीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०२६) :** (१), (२), (३) व (४)

जिल्हाधिकारी, नागपूर तथा सहव्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, नागपूर यांच्यामार्फत मिहान (नागपूर) येथील कार्यरत कंपन्यांसंबंधित सर्व अद्ययावत माहिती लाइव्ह ॲप ऐवजी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या www.madcindia.org या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येते.

तसेच मिहान प्रकल्पातील कंपन्यांमध्ये होणारी पदभरती ही त्यांच्या संकेतस्थळ, वर्तमानपत्रे तसेच सामाजिक माध्यमावर प्रकाशित करण्यात येते.

---

### घेरा सिंहगड (जि.पुणे) च्या विस्तृत भौगोलिक क्षेत्रामुळे ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात अनेक अडचणी येत असल्याबाबत

**(२) ९०६ (२४-०४-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घेरा सिंहगड (जि.पुणे) च्या विस्तृत भौगोलिक क्षेत्रामुळे ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारणास्तव सांबरेवाडी-आतकरवाडी आणि मोरदारवाडी-थोपटेवाडी अशा दोन स्वतंत्र ग्रामपंचायती स्थापन केल्यास प्रशासकीय कार्यक्षमता वाढेल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ग्रामपंचायती अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये स्मशानभूमीची सुविधा नसल्यामुळे नागरिकांना रस्त्यावरच अंत्यसंस्कार करावे लागत असल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे तसेच सदर महसूली गावांचे गावठाण प्रस्ताव

प्रलंबित असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कॉंढणपूर ग्रामपंचायतीचे विभाजन करून अवसरवाडी महसूली गावासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत निर्मिती करण्याच्या मागणीचा प्रस्ताव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर सर्व प्रलंबित प्रस्ताव आणि समस्यांवर निर्णय घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (०६-०२-२०२६) :**(१) होय.
(२) हे खरे आहे, तथापि, सांबरेवाडी-आतकरवाडी आणि मोरदारवाडी-थोपटेवाडी ग्रामविकास विभागाच्या दिनांक १२.०२.२००४ च्या शासन निर्णयानुसार लोकसंख्या निकष पूर्ण करीत नसल्याने विभाजन करण्यास पात्र नाहीत.
(३) अंशत: खरे आहे,
स्मशानभूमीसाठी जागा मागणीबाबत वन विभागाकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे. गावठाण दर्जा मिळण्यासाठी प्रस्ताव उपविभागीय अधिकारी, हवेली यांच्याकडे सादर करण्यात आला आहे.
(४) कोंढणपूर ग्रामपंचायत विभाजन करुन अवसरवाडी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याकरीता ग्रामविकास विभागाच्या दिनांक १२.०२.२००४ च्या शासन निर्णयानुसार आवश्यक १००० लोकसंख्या निकष पूर्ण करत नसल्यामुळे प्रस्ताव सादर नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील वारजे भागातील पोलीस स्टेशनसाठी आरक्षित असलेली जागा ताब्यात घेणेबाबत

**(३) १००५ (२६-०४-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील वारजे भागातील पोलीस स्टेशनसाठी आरक्षित असलेली जागा ताब्यात घेण्यास नाहक विलंब होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू जागा ताब्यात घेण्यास होत असल्याचे विलंबाची कारणे काय आहेत तसेच कोणत्या तांत्रिक अडचणी उद्‌भवत आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन आरक्षित जागा ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०२६) :** (१) नाही.
(२) नाही.
प्रचलित तरतुदींनुसार आरक्षित क्षेत्र खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने संपादित करुन घेण्यासाठी व त्यासाठी आवश्यक रक्कमेचा तपशील मिळण्यासाठी दिनांक ११.०९.२०२४ अन्वये सविस्तर प्रस्ताव जिल्हाधिकारी, भूसंपादन समन्वय, पुणे यांना सादर करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक २३.०९.२०२४ अन्वये कळविण्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेकडे पत्रव्यवहाव्दारे पाठपुरावा करण्यात आला. त्यानुसार आरक्षित जागेसाठी पुणे महानगरपालिका मुख्य सभेकडून ठराव क्र.१९४ दिनांक १९/०९/२०२५ अन्वये मान्यता देण्यात आली असून पुणे महानगरपालिकेच्या दिनांक १७.११.२०२५ च्या पत्रान्वये वारजे पोलीस ठाणेसाठी आरक्षित वारजे सर्व्हे नं. १११/१ मधील ७६११ चौ.मी जागा संपादित करून घेण्यासाठी रु.३३.७६ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(३) वर नमूद प्रमाणे कार्यवाही करण्यात आली असून निधीच्या उपलब्धतेनुसार या जागेच्या भूसंपादनासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात रिक्षा आणि मीटर टॅक्सी धारकांचे कल्याणकारी मंडळ कागदोपत्रीच असल्याबाबत

**(४) १७१० (२६-०४-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रिक्षा आणि मीटर टॅक्सी धारकांसाठी कल्याणकारी मंडळाची स्थापना करुन ५० कोटीचा निधी देऊनही अद्याप हे मंडळ कागदोपत्रीच असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात १५ लाख पेक्षा जास्त रिक्षाचालक आणि ८० हजारापेक्षा जास्त मीटर टॅक्सी धारकाकडून ८०० रुपये नोंदणी शुल्क घेण्यात येत असल्याने ते किमान १२० कोटी रुपये एवढे होत असून शासन मात्र ५० कोटी देत असल्याने केवळ नाममात्र शुल्क घेऊन रिक्षा आणि मीटर टॅक्सी धारकांची नोंदणी करण्याची मागणी मुंबई रिक्षा टॅक्सीडेंट युनियनने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच रिक्षा चालकांना वयाच्या ६५ वर्षानंतर पेन्शन, रिक्षा चालकाच्या मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबीयांना दहा लाखाचा विमा किंवा नुकसान भरपाई, मुलांच्या शिक्षणासाठी दहा लाख रुपये पर्यंत बिनव्याजी कर्ज द्यावे व त्यांना पाच लाख रुपयापर्यंत विमा योजना व अन्य कल्याणकारी योजना शासनाने राबविण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रिक्षा व टॅक्सी धारकांसाठी कार्यालय स्थापन करुन मागण्या मान्य करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१०-०२-२०२६) :** (१) ऑटो- रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यास दिनांक १६.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर शासन निर्णयान्वये महाराष्ट्र ऑटो-रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी कल्याणकारी मंडळास शासनाकडून एकवेळचे अनुदान रू. ५०.०० कोटी इतके मंजूर केले आहे.
(२) व (३) धर्मवीर आनंद दिघे साहेब ऑटो-रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाकरिता सदस्य नोंदणी करताना नाममात्र शुल्क घेऊन रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी धारकांची नोंदणी करण्याची मागणी मुंबई रिक्षा युनियनने केली आहे. दिनांक २४.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार सभासदांकडून नोंदणी शुल्क व ओळखपत्र शुल्क रक्कम रूपये ५००/- तसेच वार्षिक सभासद शुल्क रुपये ३००/- निश्चित करण्यात आले असून ऑटो रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालकांसाठीच्या विविध योजनांचा तपशील सदर शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आला आहे. तसेच धर्मवीर आनंद दिघे साहेब ऑटो-रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाची कार्यपद्धती/ कामकाजाबाबतची नियमावली दिनांक २४.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये जारी करण्यात आली आहे.
(४) धर्मवीर आनंद दिघे साहेब ऑटो-रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाचे कार्यालय ठाणे येथे स्थापन करण्याबाबत दिनांक ०३.०७.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. सद्य:स्थितीमध्ये प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे, पहिला मजला, पूर्व द्रुतगती मार्ग, लुईसवाडी ठाणे (पश्चिम) ४०० ६०४ येथे धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटो रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाचे मुख्य कार्यालय स्थापन करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डेक्कन ओडिसी रेल्वे गाडी लवकरात लवकर सुरु करण्याबाबत**

**(५) १७२७ (०८-०४-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देश विदेशातील पर्यटकांसाठी महाराष्ट्र शासन आणि मध्य रेल्वेच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेली डेक्कन ओडिसी ही आलिशान रेल्वे गाडी मागील अनेक वर्षापासून यार्डात उभी राहिली असल्याने पर्यटकांच्या गैरसोयीसह शासनाचा कोट्यवधी रुपयाचा महसूल बुडत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यटकांसाठी सुरु करण्यात आलेली डेक्कन ओडिसी गाडी कोणत्या कारणासाठी बंद करण्यात आली याची सविस्तर माहिती शासनाकडे उपलब्ध आहे काय,

(३) असल्यास, पर्यटकांसाठी निर्माण केलेली डेक्कन ओडिसी गाडी लवकरात लवकर सुरु करुन बुडत असलेला शासनाचा महसूल पुन्हा सुरू करण्यासाठी आणि पर्यटकांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (०४-०२-२०२६) :** (१) हे, खरे नाही.

(२) व (३) डेक्कन ओडिसी ट्रेन ही पंचतारांकित सुखसोईनी सुसज्ज ट्रेन असून या ट्रेनमध्ये पर्यटनासाठी पर्यटक येत असून त्यामध्ये परदेशी पर्यटकांचे प्रमाण सुमारे ९५ % आहे. पण २०२० पासून जगभरात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव झाल्यामुळे परदेशी पर्यटकांना भारत सरकारने व्हिजाद्वारे प्रवेश बंद केल्यामुळे काही दिवस डेक्कन ओडिसी ट्रेन बंद करण्यात आली होती.

सद्या, डेक्कन ओडिसी या ट्रेनचे संचालन मे. एबिक्स ट्रॅव्हलद्वारे करण्यात येत असून सन २०२३-२४ पासून ही ट्रेन समाधानकारपणे सुरु असून त्यातून शासनास महसूल प्राप्त होत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**देगलूर व बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील विद्युत ट्रान्सफॉर्मरच्या अडचणीमुळे शहरी व ग्रामीण भागात निर्माण होणाऱ्या समस्याबाबत**

**(६) २१०१ (२७-०४-२०२५). श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर व बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील शेतकरी व व्यवसायिकांना विद्युत ट्रान्सफॉर्मर वारंवार बिघाड होऊन बंद पडत असल्यामुळे आर्थिक नुकसानाला सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तांत्रिक अडचणीमुळे शेतकऱ्यांच्या हातास आलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नवीन विद्युत रोहित्र देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

महावितरण कंपनीच्या देगलूर विभागाअंतर्गत देगलूर व बिलोली या तालुक्यांचा समावेश होतो. नादुरुस्त रोहित्र दुरुस्त करण्यासाठी महावितरण कंपनीमार्फत विभागनिहाय रोहित्र दुरुस्त करणाऱ्या एजन्सी नियुक्त करण्यात आलेल्या

आहेत. नादुरूस्त होणारे वितरण रोहित्रे महावितरण कंपनीमार्फत तातडीने बदलण्यात येतात.

नांदेड मंडळाअंतर्गत वितरण रोहित्रे बदलण्यासाठी विभागीय भांडारात दुरुस्त केलेले ९७ थ्री फेज वितरण रोहित्रांचा साठा आहे. तसेच नादुरूस्त वितरण रोहित्रे वेळेत बदलण्यासाठी एकूण ४४३ थ्री फेज वितरण रोहित्रे चक्राकार पध्दतीने उपलब्ध आहेत.

(२) व (३) महावितरण कंपनीच्या निरंतर वीज योजनेअंतर्गत ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीज पुरवठा देण्याकरीता १५ वर्ष जास्त जुने विद्युत रोहित्रे बदलविणे, विद्युत रोहित्रांचे ऑईल बदलविणे आणि पूर्ण क्षमतेएवढी पातळी करणे ही कामे करण्यात येत आहेत. निरंतर वीज योजनेअंतर्गत नांदेड मंडळ कार्यालयास आजपर्यंत १०० केव्हीए क्षमतेची एकूण ४० व २०० केव्हीए क्षमतेची एकूण ३० नग नवीन वितरण रोहित्रे देण्यात आली आहेत. सदर रोहित्रे महावितरण कंपनीच्या विभागीय कार्यालयामार्फत वितरीत करुन बसविण्यात आली आहेत.

सन २०२५-२६ मध्ये दिनांक ०१.०४.२०२५ ते २५.११ २०२५ या कालावधीत नांदेड मंडळ कार्यालयास एकूण २०४ किलोलिटर ऑईल उपलब्ध करून देण्यात आले असून, त्यापैकी नांदेड मंडळ कार्यालयाच्या मध्यवर्ती भांडारगृहात २० किलोलिटर ऑईलचा साठा उपलब्ध आहे. ऑईलचा मुबलक साठा उपलब्ध असून रोहित्रे दुरूस्ती किंवा काम असलेल्या रोहित्रासाठी ऑईलची कमतरता भासणार नाही याची दक्षता महावितरण कंपनीमार्फत घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धनेगाव (ता.केज, जि. बीड) येथील मांजरा प्रकल्प येथे जागतिक दर्जाचे जलपर्यटन विकसित करण्याकरिता सर्वेक्षण आराखडा तयार करणेबाबत.**

**(७) २२२१ (२७-०४-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनेगाव (ता.केज, जि.बीड) येथील मांजरा प्रकल्प येथे जागतिक दर्जाचे जल पर्यटन विकसित करण्याकरीता प्रत्यक्ष स्थळ भेट देऊन सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत वरिष्ठ व्यवस्थापक (जलपर्यटन), म.प.वि.म.मुंबई यांनी मा.डॉ. सारंग कुलकर्णी, सल्लागार (जलपर्यटन), मुख्याप्रशिक्षक तथा महाव्यवस्थापक, इसदा, तारकर्ली, (ता. मालवण, जि.सिंधुदुर्ग) यांना दिनांक १ जानेवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सर्वेक्षण आराखडा तयार करण्यात आला आहे किंवा येत आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (०४-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) जल पर्यटन सल्लागाराची नियुक्ती करणेबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर असून सल्लागार नियुक्ती होताच सर्वेक्षण आराखडा तयार करण्याची कार्यवाही हाती घेण्याचे नियोजित आहे.

---

**बीड जिल्ह्यातील गावामध्ये ३३/११ के.व्ही.चे सबस्टेशन मंजूर करण्याबाबत**

**(८) २२५७ (२८-०४-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील पाली, ताडसोना, लिंबारूई, आहेरधानोरा, बोरखेड, चहाटा व मोरगाव या गावामध्ये ३३/११ के.व्ही.चे सबस्टेशन मंजूर करण्याबाबतची मागणी ७ ते ८ शेतकऱ्यांनी व ग्रामस्थांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अधीक्षक अभियंता, बीड यांना दिनांक २४ डिसेंबर, २०२४ रोजीच्या पत्रान्वये निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने ३३/११ के.व्ही.चे सबस्टेशन मंजूर करण्यासह निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०२६) :** (१), (२) व (३) हे खरे आहे,

बीड तालुक्यातील पाली, ताडसोना आणि लिंबारुई येथे नवीन ३३/११ के.व्ही. १x५ एम.व्ही.ए. उपकेंद्र आशियाई विकास बँकेच्या (ADB) योजनेअंतर्गत समाविष्ट करण्यात आली आहेत. यासंबंधीची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर असून, सदर निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पाली, ताडसोना आणि लिंबारुई येथील उपकेंद्राची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात येतील.

तसेच, आहेरधानोरा येथील नवीन उपकेंद्राचा प्रस्ताव सुधारित वितरण क्षेत्र योजना विद्युत प्रणाली बळकटीकरण (RDSS Modernization) या योजनेत समाविष्ट करण्यात आला आहे

मौजे बोरखेड, चऱ्हाटा आणि मोरगाव येथील नवीन उपकेंद्रांच्या प्रस्तावांची नव्याने तांत्रिक सुसाध्यता पडताळणी करण्याच्या सूचना संबधित लातूर परिमंडळ कार्यालयास देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ऊर्जा विभागातील महावितरण कंपनीमधील विद्युत सहाय्यक पदाच्या पदभरतीबाबत

**(९) २८६६ (२६-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऊर्जा विभागातील महावितरण कंपनीमधील जाहिरात क्र.०४/२०१९ विद्युत सहाय्यक ५००० पदांपैकी रिक्त असलेल्या १५५९ जागेची तिसरी यादी रिक्त जागांच्या आढाव्यानुसार अथवा महावितरणच्या नियमानुसार लावण्याबाबत आणि भरती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (औसा) यांनी मा. मुख्यमंत्री यांना दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच उपरोक्त भरतीमधील SEBC प्रवर्गातील अधिसंख्य पदाच्या २८२ पदातील रिक्त पदांची प्रतीक्षा यादी प्रसिध्द करून पात्र उमेदवारांना नियुक्ती देणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (औसा) यांनी मा. मुख्यमंत्री महोदय यांना माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) जाहिरात क्र. ०४/२०१९ विद्युत सहाय्यक ५००० पदांपैकी निवड प्रक्रियेअंती रिक्त राहिलेल्या सुमारे १५५९ पदाची अतिरिक्त प्रतिक्षा यादी लावणेबाबत लोकप्रतिनिधी तसेच काही उमेदवारांकडून निवेदने प्राप्त झाली होती. रिक्त असलेल्या सुमारे १५५९ पदाकरीता अतिरिक्त प्रतिक्षा यादीबाबत विधी व न्यायविभाग महाराष्ट्र शासन यांचेमार्फत मा. महाधिवक्ता यांचा कायदेशीर अभिप्राय मागविण्यात आला होता. या संदर्भात निवड प्रक्रियेअंती रिक्त राहिलेल्या पदाइतकी अतिरिक्त प्रतिक्षा यादी तयार करणे नियमाधीन होणार नाही असा कायदेशीर अभिप्राय नोंदविलेला आहे.

जाहिरात क्र. ०४/२०१९ मध्ये अर्ज केलेल्या एस.ई.बी.सी ते ई.डब्ल्यू.एस विकल्प स्विकारलेले काही उमेदवार मा. न्यायालयाने याचिका क्र.५१९६/२०२१ मध्ये दिनांक २९/०७/२०२२ राजो दिलेल्या आदेशामुळेनिवड यादीतून बाहेर पडले होते. याबाबत, सदर उमेदवारांकडून शासनास प्राप्त निवेदनानुसार शासन पत्र दिनांक ०१/०३/२०२४ अन्वये एक विशेष बाब म्हणून सदर उमेदवारांची अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबतचे निर्देश शासनाकडून प्राप्त झाले होते. सबब, २८२ उमेदवारांची अधिसंख्य पदे निर्माण करून पात्र उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत. जाहिरातीची निवड व प्रतिक्षा यादी पूर्णपणे कार्यान्वित केलेनंतर भरती प्रक्रिया पूर्णझालेली आहे. तथापि, सदर उमेदवारांची कोणतीही प्रतिक्षा

यादी उपलब्ध नाही.

सद्यस्थितीत महावितरण मधील रिक्त पदे नव्याने भरणेकरीता जाहिरात क्र.०६/२०२३ प्रसिद्ध करण्यात आली असून भरती प्रक्रिया सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरातील वडगाव बुद्रुक, सिंहगड रोड येथे बांधण्यात आलेली क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले अभ्यासिका सुरु करण्याबाबत

**(१०) ३१३६ (०१-०५-२०२५). श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील वडगाव बुद्रुक,सिंहगड रोड येथे पुणे म.न.पा. ने ३ कोटी खर्च करुन क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले अभ्यासिका बांधली असून सन २०२१ मध्ये त्याचे उद्घाटन स्थानिक लोकप्रतिनीधी, आमदार, महापौर यांनी केले तेव्हा पासून ही अभ्यासिकेसाठी तयार केलेली इमारत विदयुत कनेक्शन देण्याच्या नावाखाली बंद असून महानगरपालिका ने गोदाम म्हणून वापरायला सुरुवात केल्याचे दिनांक १७ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारत बांधतांना होणाऱ्या खर्चामध्ये विदयुत कनेक्शन साठी होणारा अपेक्षित खर्च धरला नसून इमारतीचे बांधकाम, करण्यासाठी काढण्यात येणाऱ्या निविदा मध्ये विदयुत जोडणीची अट घालण्यात आली नव्हती तसेच निविदा काढून ठेकेदारास इमारतीचे काम देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या इमारती मध्ये असलेले साहित्य कोणाच्या मालकीचे आहेत तसेच साहित्य ठेवण्यासाठी महानगरपालिकेची परवानगी घेण्यात आली होती काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर इमारतीचा उपयोग गोडाऊन म्हणून न करता बंद असलेली अभ्यासिका मध्ये विदयुत जोडणी देऊन सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०२-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे,

या ठिकाणी पुणे महानगरपालिकेच्या मध्यवर्ती कोठीचे तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतर करण्यात आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सदर इमारतीच्या बांधकामाच्या निविदेमध्ये विद्युत विषयक कामांचा समावेश नव्हता. तथापि इमारतीचे स्थापत्य विषयक काम ठेकेदारास निविदा काढून देण्यात आले आहे.

(३) या इमारतीमधील माल पुणे महानगरपालिकेच्या मालकीचा असून याठिकाणी माल ठेवण्याबाबत पुणे महानगरपालिका आयुक्त यांची माहे जानेवारी, २०२४ मध्ये मान्यता घेण्यात आलेली आहे.

(४) सदर इमारतीमधील विद्युतविषयक कामे पूर्ण असून या ठिकाणच्या कोठी कार्यालयासाठी अन्यत्र जागा उपलब्ध करण्याची कार्यवाही पुणे महानगरपालिकेकडून सुरु आहे. पर्यायी जागा उपलब्ध झाल्यानंतर साहित्य स्थलांतरित करुन या ठिकाणी अभ्यासिका सुरु करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.

---

## संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील देवरुख जवळ नवीन अति उच्च व्होल्टेज उपकेंद्र स्थापन करण्याबाबत

**(११) ३२५९ (२७-०४-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील आरवली (११०/३३ के.व्ही) व निवळी या ठिकाणच्या अति उच्च व्होल्टेज उपकेंद्रावरुन पुढील आरवली, संगमेश्वर व आरवली पासून देवरुख पर्यंत ४० ते ४५ कि.मी. अंतरावर असलेल्या देवरुख

या तीन सबस्टेशनना वीज पुरवठा केला जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संगमेश्वर तालुक्याच्या भौगोलिक परिस्थितीमुळे वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यास मोठ्या अडचणी येत असून, यामुळे घनदाट जंगल, दऱ्या-खोरी आणि सतत बदलणारे हवामान तसेच वादळ, जोरदार पाऊस किंवा झाडे कोसळत असल्याने ओव्हरहेड लाईन तुटण्याच्या घटना वारंवार होत असल्याने देवरुखकरीता अखंडीत वीज पुरवठा मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, देवरुखमध्ये ४० हजार घरगुती ग्राहक तर सुमारे ५ हजार व्यावसायिक ग्राहकांना व अनेक शैक्षणिक संस्थांना विद्युत सेवा महावितरणमार्फत पुरविली जात असून, त्यामुळे वेगाने वाढणारी वीज पुरवठ्याची मागणी पाहता देवरुख जवळ नवीन अति उच्च व्होल्टेज उपकेंद्राची स्थापना करणे अत्यंत आवश्यक असल्याने सदर प्रकरणी स्थानिक नागरीकांनी शासनाकडे पाठपुरावा केला नंतरही सदर मागणी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, देवरुख आणि संगमेश्वरच्या मध्यवर्ती असलेल्या बुरंबी आणि ताम्हाने या दोन गावातून मुख्य अति व्होल्टेज वीज लाईन (३३ के.व्ही.) जात असल्याने सदर ठिकाणी नवीन अति उच्च व्होल्टेज उपकेंद्राची स्थापना झाल्यास याचा मोठा फायदा देवरुख व संगमेश्वरांच्या नागरिकांना होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने माहिती घेऊन अति उच्च व्होल्टेज उपकेंद्राची स्थापना करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
संगमेश्वर तालुका हा घनदाट जंगलाचा व दऱ्याखोऱ्यांचा असून ३३ के.व्ही. संगमेश्वर वीजवाहिनी या परीसरातून जाते. पावसाळ्याच्या कालावधीमध्ये जोराचा पाऊस तसेच वाऱ्यामुळे वाहिनीवर झाडे पडून पोल उन्मळून पडण्याचे तसेच तारा तुटण्याचे प्रमाण जास्त असते. परिणामी सदर भागामध्ये या काळात वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढते. महावितरणचे कर्मचारी तथा सुचिबद्ध ठेकेदार यांच्यामार्फत वाहिनीवर झालेला बिघाड, पडलेले पोल तथा तुटलेल्या वाहिन्या कमीत कमी वेळेत पूर्ववत करुन वीज पुरवठा सुरळीत केला जातो.
(३) देवरुख उपविभागांतर्गत २७४५ घरगुती, २७२८ वाणिज्यिक, औद्योगिक व इतर असे एकूण ३०१८६ ग्राहक आहेत.
(४) हे खरे आहे,
११०/३३ के.व्ही. आरवली उपकेंद्र ते ३३/११ के.व्ही. देवरुख वीज उपकेंद्र हे अंतर ४५ कि.मी. इतके आहे व ३३ के.व्ही. संगमेश्वर वाहिनीवर एकूण तीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्रे जोडली गेली आहेत. मौजे बुरंबी, ता. संगमेश्वर येथे ११०/३३ के.व्ही. वीज उपकेंद्र झाल्यास सदर उपकेंद्रापासून देवरुख हे अंतर २५ किमीने कमी होऊन देवरुख भागातील ग्राहकांना योग्य दाबाने अखंडीत वीजपुरवठा करण्यास मदत होणार आहे.
(५) मौजे बुरंबी येथे ११०/३३ के.व्ही. अतिउच्च दाब उपकेंद्राच्या उभारणीचा प्रस्ताव महावितरण कंपनीमार्फत दिनांक २७.११.२०२५ रोजी महापारेषण कंपनीस सादर करण्यात आला असून, याबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यातील सौरऊर्जेस चालना देण्याकरिता सोलार अॅग्रो लिमिटेडची करण्यात आलेली स्थापना**

**(१२) ३५७६ (२७-०४-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सौरऊर्जेस चालना देणेबाबत राज्यात घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक तसेच सर्व कार्यालये सौर ऊर्जेवर करण्याबाबतचे धोरण महावितरण विभागाचे अध्यक्ष तथा सहव्यवस्थापकीय संचालक, श्री.लोकेशचंद्र यांनी निश्चित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने माहे मार्च, २०२६ पर्यंत १६००० मेगा वॅट सौरऊर्जा तयार करण्यासाठी महाराष्ट्र सोलार ॲग्रो लिमिटेडची स्थापना करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर योजनेच्या पूर्ततेसाठी प्रत्यक्षात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०२-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे, केंद्रसरकारच्या नवीन व नवीनकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या (MNRE) रुफ टॉप सौर योजना मार्गदर्शक तत्वानुसार व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्रीडला जोडलेली परस्पर सक्रीय छत्तावरील नुतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा, विनिमय, २०१९ च्या अनुषंगाने प्राप्त मार्गदर्शक तत्वानुसार महावितरण कंपनीने घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक, तसेच सर्व कार्यालयांवर सौर ऊर्जा यंत्रणा आस्थापित करण्याकरीता, ग्रीडला जोडण्याकरिता आणि त्यासंबंधीचे अर्ज स्वीकारण्याकरीता ऑनलाईन आयस्मार्ट (ismart) पोर्टल विकसित करण्यात आलेले आहे.
(२) हे अंशत: खरे आहे, राज्यातील शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी शासनाने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० जाहीर केली असून या योजनेतंर्गत योजनेची एकूण १६००० मे.वॅ. सौर ऊर्जा स्थापित करण्याचे उद्दिष्टे ठरविण्यात आले आहे. याबाबत कार्यक्षम अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी तसेच सौर कृषी वाहिनी प्रकल्पांचे समन्वय, देखरेख आणि अंमलबजावणी मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र सोलर ॲग्रो प्रा. लिमिटेडची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.
(३) महाराष्ट्र सोलर ॲग्रो पॉवर लि. कंपनीकडून सौर ऊर्जा विकासकांची निवड करण्यासाठी महावितरणमार्फत निविदा प्रक्रिया राबविण्यात येते आहे. MSKVY २.० या योजनेसाठी १५७०९ मे. वॅ. क्षमतेकरिता निविदा जाहिर केल्या असून त्यापैकी १५४०४ मे. वॅ. क्षमतेसाठी कार्यादेश देण्यात आले आहेत. MSKVY योजने अंतर्गत ३३४९ मेगावॅट क्षमता कार्यान्वित झाली असून, या योजनेमुळे राज्यातील २२७२ ॲग्रीफिडर मार्फत ८,९०,९९७ कृषीपंपाना दिवसा वीज पुरवठा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**जळगांव जिल्हयातील जामनेर ते मलकापूर रेल्वे मार्ग जोडणीकरिता तत्कालिन रेल्वे राज्यमंत्री यांनी दिलेली मान्यता**

**(१३) ३९७० (२७-०४-२०२५). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जामनेर ते मलकापूर (जि. जळगांव) रेल्वे मार्ग जोडणीकरिता तत्कालिन रेल्वे राज्यमंत्री, भारत सरकार यांनी मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावात जर जामनेर ते बोदवड आणि पुढे बुऱ्हाणपूर (असीरगड) पर्यंत जोडल्यास दक्षिण रेल्वे मार्ग मधील अंतर कमी होऊन पैसा व वेळेचा अपव्यय होणार नसल्याने खान्देश रेल्वे संघर्ष समिती, भुसावळ यांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधिताकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (११-०२-२०२६) :** (१), (२) व (३) मध्य रेल्वे बांधकाम संघटनेकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार, पाचोरा-जामनेर या रेल्वे मार्गाचे बोदवड(मलकापूर) पर्यंत विस्तारासह नॅरो गेजचे ब्रॉडगेजमध्ये रुपांतरण (PB Item No.१८ of २०२४-२५) ऑगस्ट, २०२२ मध्ये मंजूर झाले आहे. पाचोरा-जामनेर आणि पुढे बोधवड-(मलकापूर) पर्यंतच मध्य रेल्वेकडून गेज रुपांतरणाचे काम करण्यात येत आहे. सदर काम सुरु आहे. जमिन अधिग्रहनाची प्रक्रिया सुरु आहे. EPC निविदा जारी केली असून तपासणी सुरु आहे. बोदवड ते बुऱ्हानपूर (असीरगड)

या मागणीसाठी कोणतेही सर्वेक्षण मंजूर केलेले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महावितरणने राज्य वीज नियामक आयोगासमोर दाखल केलेल्या याचिकेमध्ये दरवाढ केल्याबाबत

**(१४) ४१११ (२७-०४-२०२५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरणाने राज्य वीज नियमक आयोगासमोर सन २०२५ ते सन २०३० या वर्षासाठी याचिका दाखल केली असून त्यात प्रचंड प्रमाणात दरवाढ केली असून ही दरवाढ दिनांक १ एप्रिल, २०२५ पासून लागू करणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरणकडून चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोदिया, नागपूर यासह राज्यातील काही जिल्हयात वीज ग्राहकांच्या घरी स्मार्ट मिटर जबरदस्तीने बसविण्यात येत असल्यामुळे जिल्हा वितरण कंपनीचे कर्मचारी व वीज ग्राहकांत प्रचंड वाद निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निवडणूकीच्या आधी हे स्मार्ट मिटर बसविण्याबाबत शासनाने स्थगिती दिली होती मात्र निवडणूका होताच स्मार्ट मिटर बसविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ग्राहकांच्या समंतीशिवाय स्मार्ट मिटर बसविण्यात येऊ नये व विज दरवाढ लागू करण्यात येऊ नये याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

मागील वर्षांतील वीज दरवाढीचा ऐतिहासिक कल लक्षात घेता, महावितरण कंपनीने "प्रचलित पद्धतीने व्यवसाय (Business as Usual)" पद्धती अवलंबली असती तर, आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये रु.९.४५ प्रति युनिट इतका सरासरी वीज पुरवठा दर, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये रु.१०.३२ प्रति युनिटपर्यंत व आर्थिक वर्ष २०२९-३० मध्ये रु.१४.६७ प्रति युनिटपर्यंत वाढलेला असता. परंतु महावितरण कंपनीने गेल्या अडीच वर्षात राज्याच्या वीज पुरवठ्यासाठी केलेल्या नियोजनामुळे आगामी पाच वर्षात कंपनीची वीज खरेदी खर्चात ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याने त्याचा लाभ आगामी पाच वर्षासाठी महावितरण कंपनीमधील वीज ग्राहकांना देऊन वीज दरात कपात करण्याचे शक्य झाले. मा. वीज नियामक आयोगाने दिनांक २५.०६.२०२५ रोजीच्या आदेशाद्वारे पुढील पाच वर्षांकरिता सरासरी वीज पुरवठा दरामध्ये आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी २% ते आर्थिक वर्ष २०२९-३० साठी ९% कपात मंजूर केली आहे. सुधारीत वीजदर हे १ जुलै, २०२५ पासून लागू आहेत.
(२) व (३) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या दिनांक १७.०८.२०२१ रोजीच्या राजपत्रानुसार सर्व वीज वितरण कंपन्यांना स्मार्ट मीटर बसविण्याचे सुचित केले आहे. त्यानुसार राज्यात वीजेच्या वापरासाठी स्मार्ट मीटर प्रथम महावितरणच्या विविध प्रणाली मध्ये बसविण्यात येत आहेत. तद्नंतर शासकीय कार्यालये, शासकीय वसाहती तसेच उच्चदाब व लघुदाब औद्योगिक, वाणिज्यिक ग्राहकांना व नवीन वीज जोडणी करीता बसविण्यात येत आहेत. महावितरण कंपनीकडून स्मार्ट मीटर बसविताना ग्राहकांना त्यांचे प्रबोधन करुन व त्यांना स्मार्ट मीटर संबंधी माहिती देऊन तसेच सोसायटयांमधील सदस्यांची भेट घेऊन मीटर बसविण्यात येत आहेत. तसेच इतर ग्राहकांचे स्मार्ट मीटर बद्दल गैरसमज दूर करून त्यांना स्मार्ट मीटर बसविण्यात येत आहेत. स्मार्ट प्रीपेड मीटर बसविण्याबाबत काही ग्राहक संघटना, वीज कामगार संघटनांनी विरोध दर्शविला होता. त्याअनुषंगाने आश्वासित केल्याप्रमाणे सद्यस्थितीत ग्राहकांना सदर मीटर प्रीपेड पध्दतीने न बसविता सध्याच्या प्रचलित पोस्ट पेड पध्दतीनेच बसविण्यात येत आहेत.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मत्स्यपालन, पशुपालन फार्म, रेशीमशेती व मशरुम शेती आदी कारणांसाठी वापरात असलेल्या वीज वापराची वर्गवारी "कृषी" या वर्गवारीत मध्ये करण्याबाबत

**(१५) ४६४५ (२५-०४-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांनी कृषी तथा कृषी पूरक कारणांसाठी कृषी ही एकच वर्गवारी सन २०१५ पुर्वी लागू केली होती. त्यामध्ये बदल होऊन वीज दर आदेश क्रमांक १२१/२०१४, दिनांक २६.०६.२०१५ नुसार फलोत्पादन, फुल, शेती, रोपवाटिका (नर्सरी), वृक्षारोपण, मत्सपालन, रेशीमशेती, पशुपालन फार्म इत्यादी कारणांसाठी वापरात असलेल्या वीज वापरांची वर्गवारी "कृषी इतर" मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही वर्गवारी "कृषी" सदराखाली करावी या शेतकऱ्यांच्या सततच्या रास्त मागणीचा शासन स्तरावर सकारात्मक निर्णय होऊन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वीज दर आदेश क्रमांक २२६/२०२२, दिनांक ३१ मार्च, २०२३ अन्वये दिनांक ०१ एप्रिल, २०२३ पासून सुधारित वीज वापराची वर्गवारी व वीजदर लागू करुन ही वर्गवारी "कृषी इतर" मधून "कृषी" मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही वर्गवारी जरी "कृषी" मध्ये करण्यात आली असली तरी सुधारित आदेशात मत्स्यपालन, पशुपालन फार्म, रेशीमशेती व मशरुम शेती या घटकांचा उल्लेख "कृषी" या वर्गवारीत करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोकणातील अनेक शेतकरी मत्स्यपालन, पशुपालन फार्म, रेशीमशेती व मशरुम शेती मोठ्या प्रमाणात करत असून, या घटकांचा सुधारित आदेशात समावेश नसल्याने हे घटक विकासापासून वंचित राहत आहेत, त्यामुळे शासनाकडे यासंदर्भात सातत्याने पाठपुरावा करण्यात आल्यानंतर देखील सदर प्रकरणी कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मत्स्यपालन, पशुपालन फार्म, रेशीमशेती व मशरुम शेती आदी कारणांसाठी वापरात असलेल्या वीज वापराची वर्गवारी "कृषी" या वर्गवारीत करणेसंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०२६) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे,

माहे-जून २०१५ पूर्वी, मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाद्वारे मत्स्यपालन, रेशीमशेती व पशुपालन फार्म वगळता, कृषी तथा कृषी पुरक कारणांसाठी एकच वर्गवारी निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार, सदर वर्गवारीतील ग्राहकांना "कृषी" या वर्गवारी प्रमाणे वीज दर आकारण्यात येत होते. सदर आदेशानुसार मत्स्यपालन, रेशीमशेती व पशुपालन फार्म, या प्रकारातील वीज वापर वाणिज्यिक वर्गवारीत समाविष्ट करण्यात आले होते. मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या दिनांक २६.०६.२०१५ रोजीच्या आदेशान्वये फलोत्पादन, फुल शेती, रोपवाटिका (नर्सरी), वृक्षारोपण, रेशीमशेती, पशुपालन फार्म हे कृषी (इतर) वर्गवारीमध्ये ठेवून, फक्त मत्सपालन हे औद्योगिक वर्गवारीत समाविष्ट करण्यात आले आहे.

मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या दिनांक ०१.०४.२०२३ च्या मध्यावधी वीजदर आदेशाव्दारे फलोत्पादन, फुल शेती, रोपवाटिका (नर्सरी), वृक्षारोपण, हे कृषी (मीटर) वर्गवारीमध्ये वर्गीकृत केले असून, रेशीमशेती, पशुपालन फार्म हे कृषी (इतर) वर्गवारीमध्ये ठेवण्यात आले आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या दिनांक २८.०३.२०२५ च्या बहुवर्षीय वीजदर आदेशानुसार मशरुम शेती ही कृषी (मीटर) वर्गवारीमध्ये वर्गीकृत करण्यात आली आहे. मत्सपालन, रेशीमशेती, पशुपालन फार्म हे कृषी (इतर)

मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.
(४) व (५) मा. वीज नियामक आयोगाने आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० साठीचे वर्गवारीनिहाय बहुवर्षीय वीजदर दिनांक २५.०६.२०२५ आदेशान्वये जारी केले आहेत. सदर आदेशात मा. आयोगामार्फत सर्व फुलशेती, फलोत्पादन (फळशेतीसह) रोपवाटिका आणि वृक्षारोपण या घटकांना "कृषी (मीटर)" या श्रेणी अंतर्गत वर्गीकरण करण्यात आले आहे. महावितरणमार्फत दाखल करण्यात आलेल्या बहुवर्षीय वीजदर याचिकेमध्ये काही ग्राहकांनी मा. आयोगास, मशरुमशेती श्रेणीला कृषी (मीटर) वर्गवारीत निर्दिष्ट करण्याची विनंती केली होती. त्यानुषंगाने, मा. आयोगाने सदर आदेशात मशरुम शेती श्रेणीला कृषी (मीटर) या वर्गवारीत समाविष्ट केले आहे.

तरी, महावितरणने मा. आयोगाच्या आदेशान्वये विविध ग्राहक वर्गवारीकरीता वीज पुरवठा करण्यासाठी दिनांक ०१ जुलै, २०२५ पासून सुधारीत वीजदर लागू केलेले आहेत. त्यानुसारच, महावितरणकडुन वीजदराची आकारणी करण्यात येत आहे. यामध्ये बदल करण्याचे अधिकार मा. वीज नियामक आयोगास आहेत..

---

## देशभरात लाखो टॅक्सी व रिक्षामध्ये अवैध ई-मीटर असल्याबाबत

**(१६) ४७५१ (२५-०४-२०२५). श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात रिक्षा व टॅक्सीसाठी अवैध इलेक्ट्रानिक मीटरची विक्री होत असून मा.मुंबई उच्च न्यायालयाने 'ग्लोबल' ब्रॅडच्या ई-मीटरच्या विक्रीला यापुढे मनाई केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चोकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चोकशीच्या अनुषंगाने राज्यात अवैध इलेक्ट्रानिक मीटरची विक्री रोखण्यासह वैध इलेक्ट्रानिक मीटर रिक्षा व टॅक्सीत बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१०-०२-२०२६) :** (१) होय.
(२) व (३) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या रिट याचिका क्रमांक ६०६५/२०२४ मध्ये मा. न्यायालयाने दिनांक ३१.०१.२०२५ रोजी मे. ग्लोबल मीटर मॅन्युफॅक्चरींग कंपनी यांचे उत्पादित मीटर विक्री व वितरण न करण्याबाबत आदेश पारित केले आहेत. मा. न्यायालयाच्या आदेशास अनुसरुन, मे. ग्लोबल मीटर मॅन्युफॅक्चरींग कंपनी यांचेकडील नव्याने उत्पादित केलेले भाडेमीटर यापुढे कोणत्याही ऑटोरिक्षा/टॅक्सी वाहनावर पुढील आदेश होईपर्यंत बसविण्यात येऊ नयेत, असे सर्व क्षेत्रिय कार्यालय प्रमुखांना दिनांक ०४.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी येणाऱ्या प्रत्येक ऑटोरिक्षा/ टॅक्सी भाडे मीटरची मोटार वाहन कायदा व त्या अंतर्गत असलेल्या नियमानुसार योग्य ती काटेकोरपणे तपासणी करण्याबाबत सर्व क्षेत्रिय कार्यालयांना दिनांक २०.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

केंद्र शासनाने मंजूर केलेल्या भाडेमीटर प्रतिमानामध्ये फेरफार केले असल्यास, अशा मीटरची पुन्हा चाचणी व पडताळणी करणे आवश्यक असल्याने, त्यासाठी योग्य प्रयोगशाळा अथवा संस्था याबद्दल मार्गदर्शन करणेबाबत केंद्र शासनास दिनांक १९.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मिरज (जि.सांगली) येथील शासकीय दुग्धालयाची जागा हस्तांतरीत केल्याबाबत

**(१७) ४७६२ (२५-०४-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय

**दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरज (जि.सांगली) येथील शासकीय दूग्धालय सन २००० पासून बंद पडले असून डेअरीची ५२ एकर जागा हस्तांतर करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वी या दुग्धालयाची अडीच लाख लिटर दूध संकलनाची क्षमता असून आय.एस.आय.मार्कची दुध पावडर परदेशात निर्यात केली जात असल्यामुळे आर्थिक उत्पादनात वाढ होत होती परंतू सद्या ही जागा हस्तांतरीत करण्यात येणार असल्यामुळे कर्मचाऱ्यांचे नुकसान होत असल्याने कर्मचारी आंदोलन करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मिरज येथील शासकीय दुग्धालय सुरु राहण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०६-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही
(२) अंशतः हे खरे आहे.

सन १९५७ साली स्थापन झालेल्या मिरज योजनेमार्फत त्यावेळेच्या शासन धोरण मुंबई व इतर ठिकाणी दूधाचे मागणीनुसार रोज वॅगन व इतर वाहतुक यंत्रणेमार्फत दूधाचा पुरवठा केला जात होता तसेच दूध भुकटी व देशीकुकिंग बटर व इतर दुग्ध जन्य पदार्थ उत्पादिन करण्यात येत होते.

दुग्धव्यवसाय विकास विभागाची जागा हस्तांरणाबाबत कोणताही निर्णय शासनाकडून घेणेत आलेला नाही. योजनेतील बहुतांश तांत्रिक कर्मचारी हे सेवानिवृत्ती / मयत झालेले आहेत. त्यामुळे तांत्रिक पदे रिक्त आहेत, सदरची पदे भरलेली नाहीत. तसेच कर्मचा-यांकडून कोणतेही आंदोलन करण्यात आलेले नाही.
(३) केंद्र शासनाचे मुक्त व्यापार धोरणानुसार सहकार व खाजगी क्षेत्रातील दूध धंद्यामध्ये वाढ होत गेल्याने शासनाकडील दूधाचा पुरवठा कमी होत गेल्याने माहे जून, २०१३ पासून मिरज योजना पुर्णपणे बंद असल्याने तसेच दुग्धशाळातील मशिनरीची क्षमता कमी झाल्याने शासनाने सदरची स्क्रैप मशिनरी विक्री करण्याची कार्यवाही सुरू केलेली आहे.
(४) निरंक

---

**ओला व उबर या ॲप आधारीत वाहनांमध्ये प्रवाशांना प्रवास करताना सुरक्षेसाठी तयार केलेल्या मार्गदर्शक तत्वाची अमंलबजावणी करणेबाबत.**

**(१८) ४८५९ (२५-०४-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह राज्यात उबर आणि ओला या एग्रीगेटरद्वारे चालविल्या जाणाऱ्या ॲप आधारीत वाहनामधील प्रवाश्यांच्या सुरक्षेबाबत माहे मार्च, २०२२ मध्ये उच्च न्यायालयाने शासनाला मोटार वाहन कायद्याच्या कलम ९६ अंतर्गत मसूदा नियमांना अंतिम रुप देण्याचे आणि कलम ९३(१) नुसार ॲप आधारीत वाहन सेवांना परवाने देण्याचे आदेश दिले असतानाही अद्याप शासनाने न्यायालयाच्या आदेशाचे पालन करुन मार्गदर्शक तत्वाच्या नियमांची अमंलबजावणी केली नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रवासाच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने २०२० मध्ये मोटर वाहन एग्रीगेटर मार्गदर्शक तत्वांच्या नियमांची अद्याप अमंलबजावणी न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ओला व उबर या ॲप आधारीत वाहनांमध्ये प्रवाशांना प्रवास करताना सुरक्षेसाठी तयार केलेल्या मार्गदर्शक तत्वाची अमंलबजावणी करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१०-०२-२०२६) :** (१), (२) व (३) मा. न्यायालयाच्या आदेशास अनुसरुन महाराष्ट्र राज्यात ॲप बेस वाहनांसाठीच्या समुच्चयक धोरणाकरिता श्री. सुधीरकुमार श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीच्या शिफारशी आधारभूत मानून तयार करण्यात आलेले समुच्चयक (Aggregators) धोरण लागू करण्यास दिनांक २९.०४.२०२५ रोजी आयोजित मा. मंत्रीमंडळ बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार दिनांक २०.०५.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यात ॲप बेस वाहनांसाठी समुच्चयक धोरण लागू करण्यात आले आहे. सदर धोरणाबाबतच्या नियमावलीची प्रारुप अधिसूचना दिनांक ०९.१०.२०२५ रोजीच्या अधिसूचनेन्वये निर्गमित करण्यात आली असून सदर नियम अंतिम करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील फलटण -पंढरपूर हा नविन ब्रॉडगेज रेल्वेमार्ग प्रकल्प पूर्ण करण्याबाबत**

**(१९) ५१३९ (२७-०४-२०२५). श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयातील फलटण–पंढरपूर या नविन ब्रॉडगेज रेल्वेमार्गाकरिता शासनाचा आर्थिक सहभाग देण्यास राज्य मंत्रीमंडळानी मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प महारेलऐवजी रेल्व विभागातर्फ राबविण्यात येणार असून प्रकल्पाचा अहवाल तयार करण्यात आला आहे काय, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पाकरिता किती निधीची तरतुद करण्यात आली व प्रकल्प कधी पर्यंत पूर्ण होणार आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (११-०२-२०२६) :** (१) होय.
(२), (३), (४), (५) फलटण-पंढरपूर हा नवीन रेल्वे मार्ग उभारण्याच्या प्रकल्पाचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास कंपनी (महारेल) ने तयार केला असून सदर प्रकल्प महारेलऐवजी रेल्वे विभाग़ामार्फत राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर प्रकल्पासाठी राज्य शासनाने सन-२०२५-२६ मध्ये एकूण रु.१० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित केला आहे. तथापि, सदर प्रकल्प राबविण्यास रेल्वे विभागाने अद्याप सहमती दिलेली नाही.

---

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील एम.फिल. अर्हताधारक अध्यापकांच्या नियमित सेवेसंदर्भातील त्रुटीबाबत**

**(२०) ५१७८ (०५-०५-२०२५). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमधील दिनांक १४ जून, २००६ रोजी पूर्वीच्या विहित निवड समितीमार्फत नियुक्त व नियमित सेवेला मान्यता दिलेल्या एम.फिल. अर्हताधारक ४७७ अध्यापकांकडून त्यांच्या त्रुटीची पूर्तता करण्यासाठीचा प्रस्ताव मागविण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तावात पुन्हा बऱ्याच त्रुटी आढळून आल्याने अध्यापकांच्या नियुक्त्या निकष व नियमानुसार झालेल्या नसल्यास सदर सेवा नियमित सेवा न होता ठराविक कालावधीने ती तदर्थ (कंत्राटी) ठरत असल्याने अध्यापकाचे मोठ्या

प्रमाणात नुकसान होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर त्रुटी दूर करून अध्यापकांची सेवा नियमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१३-०२-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमधील दिनांक १४ जून, २००६ रोजी पूर्वीच्या विहित निवड समितीमार्फत नियुक्त व नियमित सेवेला मान्यता दिलेल्या एम.फिल. अर्हताधारक ३२१ अध्यापकांचे प्रस्ताव मान्यतेस्तव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सादर करण्यात आले होते.
(२) हे खरे नाही.
(३) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक २.७.२०२५ व शासनाच्या दिनांक १८.०७.२०२५ च्या पत्रान्वये ३०७ एम.फिल. पदवी धारण केलेल्या पात्र अध्यापकांना एन.ई.टी. (NET) परीक्षेमधून सूट देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उध्दभवत नाही.

---

## कोल्हापूर शहरातील विविध शासकीय कार्यालय व इतर प्रयोजनासाठी शेंडा पार्क येथील जमीन शासनाचे नावे वर्ग करण्याबाबत

**(२१) ५९५६ (२९-०४-२०२५). श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरातील विविध शासकीय कार्यालय व इतर प्रयोजनासाठी शेंडा पार्क येथील ८४ हेक्टर आर इतकी जमीन शासनाच्या नावे वर्ग करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना नुकतेच दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०२-२०२६) :** (१) व (२) होय.

कोल्हापूर शहरातील विविध शासकीय कार्यालये व इतर प्रयोजनासाठी शेंडा पार्क येथील ८४ हे.आर जमीन शासनाच्या नावे वर्ग करण्याबाबत श्री. अमल महाडिक, मा. विधानसभा सदस्य यांनी दिनांक ०२/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे निवेदन केलेले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सविस्तर प्रस्ताव शासनास तात्काळ सादर करणेबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना शासनाच्या दिनांक २८/०१/२०२५ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु असून शेंडा पार्क, कोल्हापूर येथील कृषि व सार्वजनिक आरोग्य विभागाची जागा सदर विभागांच्या सहमतीने शासकीय कार्यालय व इतर प्रयोजनासाठी उपलब्ध करुन देण्याचे संकल्पित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई-विरार परिक्षेत्रातील रूग्णवाहिका चालकांकडून अवास्तव दर आकारणी होत असल्याबाबत

**(२२) ६४१३ (२६-०४-२०२५). श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार (जि.पालघर) परिसरातील रूग्णवाहिका चालकांकडून मनमानी दर आकारणी करण्यात येत असून

अवघ्या तीन ते चार किलोमीटर अंतरासाठी रूग्णांच्या नातेवाईकांकडून ३५०० रू. घेतले जात असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णांची गरज ओळखून खाजगी रुग्णवाहिका अवास्तव दर आकारून लूट करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, रूग्णवाहिकांकडून होणारी लूट थांबविण्यासाठी आरटीओने रूग्णवाहिकेचे दरपत्रक निश्चित करावे, ते प्रत्येक रूग्णवाहिकेत लावावे, त्यानुसार दर आकारून पावती देणे बंधनकारक करावे अशी मागणी स्थानिकांकडून होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१०-०२-२०२६) :** (१), (२) व (३) याबाबत स्थानिक वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसिध्द झाली होती.
(४) मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये निर्णय क्रमांक १८/२०२० अन्वये रुग्णवाहिकेचे भाडेदर ठरविण्यात आलेले आहेत.
प्रादेशिक परिवहन कार्यालय, वसई या कार्यालयाच्या अधिनस्त वायुवेग पथकामार्फत सार्वजनिक ठिकाणी दोषी आढळून येणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन अधिनियम, १९८८ अंतर्गत कारवाई करण्यासाठी दरमहा आदेशित करण्यात येते. तसेच दोषी रुग्णवाहिकांवर कारवाई करण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, वसई कार्यालयाचे आदेश क्रमांक ९७३, दिनांक १०.०१.२०२५ व आदेश क्रमांक १२४९४, दिनांक ०९.०६.२०२५ अन्वये आदेशित करण्यात आले आहे.
प्रादेशिक परिवहन कार्यालय, वसई कार्यालयाच्या वायुवेग पथकाकडून १३४ रुग्णवाहिकांची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी २७ दोषी रुग्णवाहिकांवर रुपये १,१५,५००/- इतका दंड आकारण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुण्यातील चलोही-लोहगाव येथून महाड (रायगड) येथील बिरवाडी येथे लग्नाचे वऱ्हाड घेऊन जाणाऱ्या खाजगी बसचा झालेला अपघात**

**(२३) ६६२० (२६-०४-२०२५). श्री.अशोकराव माने (बापू) दलीतमित्र (हातकणंगले) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील चलोही-लोहगाव येथून महाड (रायगड) येथील बिरवाडी येथे लग्नाचे वऱ्हाड घेऊन जाणाऱ्या खाजगी बसला दिनांक २० डिसेंबर, २०२४ रोजी अपघात होऊन बस मधील ५ प्रवासी ठार झाले व २८ पेक्षा जास्त प्रवासी जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर खाजगी बस पर्पल या कंपनीची होती काय, बसच्या कंपनीने बसची आवश्यक कागदपत्रे टॅक्स, इंशुरन्स फिटनेस पासींग हे वेळेवर केल्याचा तपास करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, राष्ट्रीय महामार्ग ७५३ हा रस्ता रस्ते विकास महामंडळाकडे येत असून या रस्त्याचे काम अनेक ठिकाणी अपूर्ण असून २५ ते ३० कि.मी. भागात मोबाईलला रेंज नसणे, पोलीस किंवा आपत्ती व्यस्थापन नसणे इ. गैरसोय असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी करुन दोषीव्यक्तींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१०-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) होय.
(३) राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३ हा रस्ता वळणाचा, घाट रस्ता असल्यामुळे काही ठिकाणी मोबाईल रेंज कमी अधिक

प्रमाणात आहे.
रायगड जिल्हा व पुणे जिल्हा यांच्या सिमेवर कोंडेथर हद्दीपर्यंत पोलीस चेक पोस्ट असून माणगाव पोलीस ठाणे हद्दीतील ताम्हीणी घाटामध्ये पोलीस विभागामार्फत दररोज पेट्रोलिंग केली जाते. तसेच उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण यांचे भरारी पथकामार्फत वेळोवेळी तपासणी केली जाते.
(४) वाहन चालक श्री. विजयकुमार चव्हाण याचा वाहनचालक परवाना दिनांक १८.०७.२०२६ पर्यंत वैध आहे. सदर वाहनचालक परवान्यावर कारवाई करणेबाबत संबंधित परिवहन कार्यालयास कळविण्यात आले आहे.
पोलीस विभागामार्फत बस चालकाविरुध्द माणगाव पोलीस ठाणे येथे रजि. क्र. ३०१/२०२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जालना येथे वीज दर कपात न केल्यामुळे स्टील उद्योग अडचणीत आल्याबाबत

**(२४) ७१८७ (१९-०९-२०२५). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक १ एप्रिल, २०२५ पासून पुढील पाच वर्षात वीज देयके कमी केले जाईल असे आश्वासन मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २८ मार्च, २०२५ रोजी विधानसभेत दिले असतांनाही ग्राहकांना वाढीव दराने वीजदेयके अदा करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जालना जिल्ह्यातील स्टील उद्योगाला महावितरणने २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी औद्योगिक ग्राहकांसाठी १०% वीज दर कपात जाहीर केली असतांनाही वीजदर कपात अंमलात न आणल्यामुळे स्टील उद्योगांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत असून त्यांचा रोजच्या खर्चावर ताण येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे वाढीव वीज देयकामुळे उत्पादन खर्च वाढत असून बाजारातील स्पर्धेत टिकून राहणे अवघड असल्याने अनेक लघुउद्योग बंद होण्याच्या उंबरठ्यावर आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन वीज दर सवलत लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही,
मागील वर्षांतील वीज दरवाढीचा ऐतिहासिक कल लक्षात घेता, महावितरण कंपनीने “प्रचलित पद्धतीने व्यवसाय (Business as Usual)” पद्धती अवलंबली असती तर, आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये रु.९.४५ प्रति युनिट इतका सरासरी वीज पुरवठा दर, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये रु.१०.३२ प्रति युनिटपर्यंत व आर्थिक वर्ष २०२९-३० मध्ये रु.१४.६७ प्रति युनिटपर्यंत वाढलेला असता. परंतु महावितरण कंपनीने गेल्या अडीच वर्षात राज्याच्या वीज पुरवठ्यासाठी केलेल्या नियोजनामुळे आगामी पाच वर्षात कंपनीची वीज खरेदी खर्चात ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याने त्याचा लाभ आगामी पाच वर्षासाठी महावितरण कंपनीमधील वीज ग्राहकांना देऊन वीज दरात कपात करण्याचे शक्य झाले. मा. वीज नियामक आयोगाने दिनांक २५.०६.२०२५ रोजीच्या आदेशाद्वारे पुढील पाच वर्षांकरिता सरासरी वीज पुरवठा दरामध्ये आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी २% ते आर्थिक वर्ष २०२९-३० साठी ९% कपात मंजूर केली आहे.
(२) हे खरे नाही.
मा. वीज नियामक आयोगाने दिनांक २५.०६.२०२५ रोजीच्या आदेशाद्वारे औद्योगिक ग्राहकांसाठी सरासरी वीजेच्या दरात आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या तुलनेत आर्थिक वर्ष २०२५-२६ करिता ०.९२% व त्यानंतर ५ व्या नियंत्रण कालावधीच्या अखेरपर्यंत ८.३६% पर्यंत कपात मंजूर केली आहे. त्यामुळे, औद्योगिक ग्राहकांचे सरासरी वीजदर आर्थिक वर्ष २०२५-२६ करिता रु.१०.७८ व आर्थिक वर्ष २०२९-३० करिता रु.९.९७ असे राहणार आहेत. सुधारीत वीजदर हे

१ जुलै, २०२५ पासून लागू आहेत.
(३) व (४) महाराष्ट्रातील औद्योगिक ग्राहकांसाठी मोठ्या प्रमाणात सवलती देण्यात आलेल्या असून, यामध्ये इलेक्ट्रिक आर्क फर्नेससह चालणाऱ्या उच्चदाब पोलाद उद्योगांसाठी उच्चदाब औद्योगिक वर्गवारीसाठी मंजूर केलेल्या मागणी आकाराच्या ७५% मागणी आकार, टाइम ऑफ डे नुसार दिवसा केलेल्या वीज वापरावर (Solar hours) लागू वीज आकाराच्या सरासरी २०%-२५% सवलत (आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३०), लोड फॅक्टर सवलत (१५% पर्यंत), वाढीव वीज वापर ०.७५ प्रति केव्हीएएच इतकी सुट, ठोक वीज वापर सवलत (रु.०.०७ प्रति युनिट ते रु.०.११ प्रति युनिट) लागू आहे. याव्यतिरिक्त, एका पाळीत चालणाऱ्या उच्चदाब औद्योगिक ग्राहकांना स्थिर आकारात सवलत (४०%) लागू आहे. तसेच, त्वरीत वीज बिल भरणा सवलत (१%) सुद्धा लागू आहे. या सर्व सवलतीचा एकत्रित विचार केल्यास व ग्राहकाने वीज वापराचे सुनियोजन केल्यास औद्योगिक ग्राहकांचे सरासरी वीज देयक निश्चितच मोठ्या प्रमाणात कमी होणार आहेत.

याव्यतिरिक्त, शासन निर्णय दिनांक २३.०६.२०२२ अन्वये विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी क्षेत्रातील उद्योगांना देण्यात येणाऱ्या सवलतीच्या दरामध्ये सुसूत्रिकरण करण्याच्या दृष्टीने शासनाने सुधारीत वीजदर सवलत जाहीर केलेली आहे. सदर सवलतीचा कालावधी सन २०२२-२३ ते २०२६-२७ पर्यंत असून सदर योजना महावितरण कंपनीतर्फे लागू करण्यात आली आहे. तसेच, मराठावाडा व विदर्भ विभागातील सर्व उद्योगांना दिनांक ३१.०३.२०२९ पर्यंत विद्युत शुल्कात माफी देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केलपाणी ते कालापाणी (ता.धडगाव, जि.नंदुरबार) येथे आदिवासी भागात रस्ते व इतर मुलभूत सुविधा उपलब्ध करण्याबाबत

**(२५) ७२९० (०८-०९-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केलपाणी ते कालापाणी (ता.धडगाव, जि.नंदुरबार) येथे रस्ताच नसल्याने श्रीमती कालीबाई नाईक या महिलेस बांबूच्या झोळीतून पायी १५ कि.मी. चे अंतर कापून उपचारासाठी आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आल्याचे दिनांक ७ एप्रिल,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही दिवसांपूर्वीच एका गरोदर मातेला झोळीतून पायपीट करत उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंत पोहोचविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी भागात शासन मोठ्या प्रमाणात निधी पुरवूनही अद्याप येथे रस्ते व इतर मुलभूत सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी भागात रस्ते व इतर मुलभूत सुविधा उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (१३-०२-२०२६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) आदिवासी उपयोजना क्षेत्रात शासनाच्या विविध विभागाकडून तसेच, जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून मुलभूत सोयी सुविधा पुरविण्याची कार्यवाही करण्यात येत असून, दरवर्षी त्यासाठी संबंधित विभागामार्फत अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात येते. आदिवासी विकास विभागाकडून इतर विभागांना आवश्यकतेप्रमाणे पुरक स्वरुपाचा निधी उपलब्ध करुन देण्यात येतो व त्यासाठी प्रतिवर्षी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे चामला (ता.जि.वर्धा) येथे ६० वर्षापासून तलाव प्रस्तावीत असल्याबाबत

**(२६) ७३८५ (१९-०९-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चामला (ता.जि.वर्धा) जवळील चाम नदीवर छोटा तलाव बांधून पाणी अडविल्यास परिसरातील १० गावांचा पाणीप्रश्न सुटू शकतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९६५ मध्ये या तलावाचा प्रस्ताव तयार केला होता मात्र येथे गेल्या ६० वर्षापासून उक्त प्रस्तावर कोणतीच कार्यवाही न केल्याने ग्रामस्थांना पाणी विकत घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने माहिती घेऊन त्याअनुषंगाने उक्त नागरिकांचा पाणी प्रश्न सोडविण्याबाबत तसेच सदर तलाव तातडीने बांधणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०४-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गुहागर (जि. रत्नागिरी) तालुक्यातील अंजनवेल, रानवी आणि वेलदूर या तीन ग्रामपंचायतींचा कर थकविल्याबाबत

**(२७) ७५२५ (२९-०९-२०२५). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर (जि. रत्नागिरी) तालुक्यातील रत्नागिरी गॅस आणि विदयुत प्रकल्प या कंपनीने अंजनवेल, रानवी आणि वेलदूर या तीन ग्रामपंचायतींचा सन २०२१-२२ पासूनचा सुमारे रु. ९ कोटी ४१ लाख रूपये इतका इमारत व जमीन कर थकविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कराविरोधात कंपनीने केलेले अपिल जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी माहे एप्रिल, २०२४ मध्ये फेटाळून कर भरण्याचे आदेश देऊन देखील कंपनीने कराची रक्कम भरली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये घेतलेल्या बैठकीत एकूण करापैकी २५ टक्के रक्कम तात्काळ देण्याचे आणि उर्वरित रक्कम टप्प्याटप्प्याने भरण्याचे कंपनी अधिकाऱ्यांनी मान्य केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार कंपनीकडून आत्तापर्यंत कराची किती रक्कम जमा करण्यात आली व कर थकविल्याची कारणे काय आहेत याबाबत शासनाने कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (०५-०२-२०२६) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) होय.

सदर कंपनीकडून अद्याप पर्यंत कराची कोणतीही रक्कम भरलेली नाही.

रत्नागिरी गॅस आणि विद्युत प्रकल्प कंपनीने सदर कर भरण्याबाबतचे प्रकरण मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केले आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे न्यायालयाचा निर्णय आल्यानंतर पुढील कारवाई करणे शक्य होणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे आगळंबे-धनगरवाडा (ठाकरवाडी) (ता.हवेली, जि.पुणे) ग्रामपंचायत येथील वन जमिनीवरील घरकुल प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(२८) ७६५६ (३०-०७-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आगळंबे-धनगरवाडा (ठाकरवाडी) (ता.हवेली, जि.पुणे) ग्रामपंचायत येथील गट नं. १५२१ या आरक्षित वन क्षेत्रामधील भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुले देण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला असून तो अद्यापी प्रलंबित आहे तसेच प्रस्तावास अद्याप मंजूरी न मिळण्याची कारणे काय आहेत,

(२) असल्यास, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद यांनी संबंधित गावातील १३ लाभार्थ्यांची यादी निश्चित केली असून प्रत्येकी ०.५० आर या प्रमाणात एकूण ०६५० आर वन जमिनीवरील क्षेत्र शासनाच्या आवास योजनेतून घरकुले बांधण्यासाठी शिफारस मा. जिल्हाधिकारी, पुणे यांना करण्यात आली असून या प्रस्तावास मान्यता देऊन प्रत्यक्षात अंमलबजावणी का करण्यात आली नाही,

(३) असल्यास, उक्त प्रस्ताव सादर करूनही लाभार्थ्यांना अद्याप घरकुले मिळाली नाहीत व ते बेघर असल्याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच प्रस्ताव मंजुरीसाठी वन विभाग व जिल्हाधिकारी यांच्यामार्फत समन्वय करण्यात आलेला आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रलंबित प्रस्तावाच्या संदर्भात जिल्हा नियोजन समितीकडून किंवा इतर कोणत्याही समितीमार्फत वेळोवेळी आढावा घेण्यात आला आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन त्यानुसार प्रस्तावास मंजूरी देण्यासाठी कोणत्या टप्प्यांवर कार्यवाही सुरू आहे तसेच लाभार्थ्यांना घरे मिळावीत यासाठी शासनाने कोणती तातडीची उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (०५-०२-२०२६) :** (१) व (२) जिल्हास्तरीय वनहक्क समितीच्या शिफारशीसह प्रस्ताव मुख्य वनसंरक्षक, पुणे यांच्याकडे सादर केला आहे. घरकुलांसाठीची जागा आरक्षीत वन क्षेत्रातील असल्याने विविध विभागांशी समन्वय साधुन निर्णय घेण्यात येत असल्याने विलंब होत नाही.

(३) होय

(४) होय, सदर विषयाबाबत उपविभागीय अधिकारी उपविभाग हवेली जि. पुणे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ७/११/२०२५ रोजी उपविभागीय स्तरीय वन समितीची बैठक घेण्यात आली.

(५) वरिल मुद्दा क्र. १ प्रमाणे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील सांगली, मिरज व ईश्वरपूर बस स्थानकांसाठी चार्जिंग स्टेनशला मंजूरी देण्याबाबत**

**(२९) ७८५६ (०६-१०-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील सांगली, मिरज व ईश्वरपूर बस स्थानकांसाठी पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात १२० ईबसेस दिल्या जाणार आहेत, मात्र या तिन्ही ठिकाणच्या चार्जिंग स्टेशनसाठी मंजूरी प्रक्रिया अद्याप प्रलंबित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चार्जिंग स्टेनशला त्वरीत मंजूरी देऊन प्रत्यक्षात ई-बसेस सुरु

करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (०२-०२-२०२६) : (**१), (२) व (३) सांगली जिल्ह्यातील इस्मामपूर बसस्थानकातील चार्जिंग स्टेशन उभारण्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असून ई चार्जिंग स्टेशन चे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच, जि. सांगली व मिराज करीता एकच चार्जिंग स्टेशन माधवनगर, सांगली येथे प्रस्तावित असून त्याची प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही सुरू आहे.

---

### पुणे-संभाजीनगर ग्रीनफिल्ड एक्स्पेस वे हा सहापदरी महामार्ग बांधण्याची केलेली घोषणा

**(३०) ७८६३ (१८-०८-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर-पुणे हा प्रवास दोन तासात करण्यासाठी 'पुणे-संभाजीनगर ग्रीनफिल्ड एक्स्पेस वे' या सहापदरी महामार्ग बांधण्याचा घोषणा केल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील महामार्गाचे काम केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२९-०९-२०२५) :**
(१), (२) व (३) पुणे शिरुर उन्नत मार्गाचे कामास दिनांक १९.०९.२०२४ रोजी मान्यता प्राप्त असून सदर कामाची निविदा प्रक्रिया पुर्ण करुन लवकरच काम हाती घेण्याचे नियोजन आहे. पुणे शिरुर छ.संभाजी नगर या ग्रीन फिल्ड मार्गाचे कामास दिनांक०१.१०.२०२४ रोजी मान्यता प्राप्त असून या कामाकरीता भूसंपादनाची कार्यवाही लवकरच सुरु करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ब्लॅकस्टोन उद्योग समूहाबरोबर केलेल्या सामंजस्य कराराबाबत

**(३१) ७८९८ (१९-०९-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ब्लॅकस्टोन उद्योग समूहासोबत शासनाने दिनांक १४ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास सामंजस्य करार केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू करारानुसार राज्यात कोणकोणत्या ठिकाणी किती रक्कमेची गुंतवणूक व अंदाजे किती रोजगार उपलब्ध होणार आहेत तसेच हे प्रकल्प किती कालावधीत कार्यान्वित करण्यात येणार आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१७-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ब्लॅकस्टोन उद्योग समूहामार्फत राज्यशासनासोबत करण्यात आलेल्या सामंजस्य करारानुसार सदर उद्योग समूहामार्फत

राज्यात आगामी कालावधीत रूपये ५००० कोटींची गुंतवणूक करण्यात येणार असून, त्याद्वारे एकूण २७,५०० प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

सदर समूहाचे प्रकल्प राज्यातील बुटीबोरी एमआयडीसी, नागपूर, चाकण एमआडीसी पुणे, पिंपरी चिंचवड एमआयडीसी, तळेगांव पुणे, मुंबई एमएमआर, नवी मुंबई व भिवंडी या औद्योगिक क्षेत्रामध्ये स्थापित होणार आहेत.तसेच सदर समूहाचे प्रकल्प २०२८ ते २०३० या कालावधीत पूर्ण होण्याची शक्यता आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे कात्रज बाह्यवळण मार्गावर होत असलेले अपघात

**(३२) ७९०४ (२३-०८-२०२५). श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे कात्रज बाह्यवळण मार्गावर अपघातात तीन व्यक्तीचे मृत्यू झाल्याचे दिनांक ३ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कात्रज बाह्यवळण सह मुंबई बेंगलोर बाह्यवळणावर सातत्याने अपघात होत असल्याच्या घटना समोर येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन या परिसरात होणाऱ्या अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०२-१२-२०२५) :** (१) हे अंशतः खरे आहे.

पुणे-कात्रज बाह्यवळण मार्ग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या आखत्यारीत आहे. पोलीस विभागाच्या नोंदीनुसार दिनांक ०३ मे, २०२५ रोजी झालेल्या अपघातात कोणीही मृत्युमुखी झालेले नाही.

(२) मुंबई बेंगलोर बाह्यवळणावर होणारे अपघात वाहन चालकांचा निष्काळजीपणा, वाहतुकीचे नियम न पाळणे, वाहनातील तांत्रिक बिघाड, अतिवेगाने वाहन चालविणे इ. कारणामुळे होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) मुंबई-बेंगलोर महामार्गावरील कात्रज बाह्यवळणावरील होणारे अपघात टाळण्यासाठी स्थानिक प्रशासन, Safety Consultant, स्वतंत्र अभियंता, RTO, Traffic Police, Save Life Foundation, यांनी दिलेल्या सुचनेस अनुसरून विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. यामध्ये वेगमर्यादा फलक, Metal Beam Crash Barrier, Rumble Strips, Cat eyes, Street Light, Blinkers इ. उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

स्वामीनारायण मंदिर-भूमकर पूल ते नवले पूल दरम्यान दोन्ही बाजूकडील सेवा रस्त्याचे काम सुरू करण्यात आले आहे. वारजे येथील मुठा नदीवर व वाकड येथील मुळा नदीवर नवीन मोठ्या पूलांची बांधकामे प्रगतीत आहेत. वडगाव येथे समांतर उड्डाणपूल बांधण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

या व्यतिरिक्त कात्रज दरीपूल ते वारजे या लांबीत Elevated Flyover प्रस्तावित असून मंजुरीनंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी,चंद्रपूर जिल्ह्यातील लाभार्थ्यांना "आयुष्यमान कार्ड" वितरीत करणेबाबत

**(३३) ७९०७ (२५-०९-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र आणि राज्य शासनाच्या समन्वयातून सर्वसामान्य रुग्णांना "आयुष्यमान कार्ड" या योजनेतंर्गत मोफत उपचार होतात, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत परभणी जिल्ह्यातील १६,०८,००० (१६ लाख ८ हजार) लाभार्थ्यांपैकी केवळ ५,७९,००(५ लाख ७९ हजार) लाभार्थ्यांनाच आयुष्यमान कार्डचे वाटप करण्यात आले असून अद्यापही तब्बल १०,००,००० (१० लाख) नागरिक सदर कार्डपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, चंद्रपूर जिल्ह्यातील लाखो नागरीकांचे रेकशकार्ड आधार कार्डशी जोडलेले नसल्याने आयुष्यमान कार्ड काढण्यास अडचणी निर्माण होत असल्याने लाखो नागरीक या कार्डापासून मिळण्याऱ्या सुविधांपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार परभणी, चंद्रपूर जिल्हयातील उर्वरित लाभार्थ्यांना तातडीने आयुष्यमान कार्ड मिळावे यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (१२-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) एकत्रित योजनेंतर्गत परभणी जिल्ह्यातील १६,०८,०८३ लाभार्थ्यांपैकी ७,४४,३०२ लाभार्थ्यांचे कार्ड निर्माण करण्यात आले आहेत. उर्वरीत लाभार्थ्यांच्या कार्ड निर्माणाचे काम क्षेत्रीय स्तरावरील आशा कर्मचारी, आपले सरकार सेवा केंद्राचे कर्मचारी आणि स्वस्त धान्य दुकानचालक यांचेमार्फ़त मोहीम स्वरुपात करण्यात येत आहे.
(३) एकत्रित योजनेंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील १८,७९,१२२ लाभार्थ्यांपैकी ७,७५,७०९ लाभार्थ्यांचे कार्ड निर्माण करण्यात आले आहेत. तर उर्वरीत लाभार्थ्यांचे कार्ड निर्माणाचे काम सुरू आहे.

आयुष्मान भारत - प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ घेण्याकरीता लाभार्थ्याकडे आयुष्मान कार्ड असणे आवश्यक आहे. तर महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजेनेंतर्गत लाभार्थ्याकडे असलेल्या शिधापत्रिकेच्या आधारे लाभ अनुज्ञेय आहेत. कार्ड नसलेल्या आयुष्मान भारत योजनेच्या लाभार्थ्यांना शिधापत्रिकेच्या आधारे राज्य शासनाच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये लाभ देण्यात येत आहे.
(४) एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत को-ब्रँडेड आयुष्मान कार्ड निर्माण आणि वितरण करण्याचे काम १००% पूर्ण करण्यासाठी नियोजन करण्यात आले असून त्यासाठी शिधापत्रिका धारकांची अद्ययावत माहिती राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणास उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पर्यवेक्षणाखाली क्षेत्रीय कर्मचा-यांमार्फ़त कार्ड निर्माण (ई- केवायसी) आणि वितरण मोहिम स्वरुपात पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच आयुष्मान कार्ड निर्माण आणि वितरणाची कार्यवाही जलद गतीने व्हावी यास्तव दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये आयुष्मान कार्ड निर्माण आणि वितरण करण्याकरिता क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या मानधनात प्रति कार्ड रू. ८/- वरून रू. ३०/- इतकी प्रोत्साहनात्मक वाढ करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेंतर्गत परभणी व सेलू तालुक्यात अर्ज न भरल्याबाबत

**(३४) ७९०८ (२०-०७-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी व सेलू तालुक्यातून सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेंतर्गत एकही अर्ज प्राप्त न झाल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शिष्यवृत्ती अर्जांच्या प्रक्रियेमध्ये टाळाटाळ अथवा हलगर्जीपणा आढळून आल्यास शिक्षणहक्क कायद्याअंतर्गत जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याचा इशारा जिल्हाधिकाऱ्यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागासह गटशिक्षणाधिकाऱ्यांना दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (२४-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही,

तसेच जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी संबंधित शाळेचे मुख्याध्यापक यांच्याकडून गटशिक्षणाधिकारी यांचेमार्फत शिष्यवृत्तीचे ऑफलाईन अर्ज स्विकारुन मार्च, २०२५ अखेर स्वीकारण्यात आलेल्या सर्व अर्जांवर कार्यवाही करण्यात आली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील हजारो निराधार लाभार्थी केवायसी करूनही योजनेच्या अनुदानापासून वंचित असल्याबाबत**

**(३५) ७९०९ (१८-०८-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील निराधारांना माहे, डिसेंबर २०२४ मध्ये वा त्यादरम्यान पासून डीबीटीद्वारे अनुदान दिले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी जिल्ह्यातील हजारो लाभार्थ्यांनी केवायसी करूनही गेल्या दीड वर्षापासून सदर योजनांच्या अनुदानापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन जिल्ह्यातील निराधारांचे थकीत अनुदान तातडीने वितरित करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ (११-०२-२०२६) :** (१) होय.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिंतूर तालुक्यातील लाभार्थी श्रावणबाळ सेवा योजनेच्या लाभापासून वंचित असल्याबाबत**

**(३६) ७९१७ (१८-०८-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतूर (जि. परभणी) तालुक्यातील श्रावणबाळ सेवा योजनेंतर्गत २१ हजार रुपये उत्पन्न असलेले ७५० लाभार्थी माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान पासून योजनेच्या लाभापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत लाभार्थ्यांच्या प्रस्तावासंदर्भात अद्यापही शासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्यामुळे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन प्रलंबित असलेल्या प्रस्तावास तातडीने मंजूरी देऊन लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नरहरी झिरवाळ (०२-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे. देऊळगाव गात (ता.सेलू,जि.परभणी) येथील मृद व जलसंधारण विभागाची सुरु असलेली बंधाऱ्याची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(३७) ७९२२ (१९-०९-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे. देऊळगाव गात (ता.सेलू,जि.परभणी) येथे वाहणाऱ्या लेंडी नदीवरील शिवारात एक किमी अंतरावर मृद व जलसंधारण विभागाच्यावतीने प्रत्येकी रु.१ कोटी २० लाख रुपये खर्च करुन दोन कोल्हापूरी बंधारे बांधण्याचे काम माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये हाती घेतले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोन्ही बंधाऱ्याची खोलीकरणाचे व सरळीकरणाचे काम गेल्या दोन महिन्यापासून प्रलंबित असल्याने पावसाळयात लेंडी नदीच्या पाण्यामुळे लगतच्या शेतात पाणी साचून पिकांच्या होणाऱ्या नुकसानीपोटी देऊळगाव येथील शेतकऱ्यांनी सदर बंधाऱ्याचे प्रलंबित काम तात्काळ पूर्ण करणेबाबतची मागणी तहसिलदाराकडे माहे मे, २०२५ मध्ये लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुसार सदर कोल्हापूरी बंधाऱ्यांची प्रलंबित कामे पावसाळयापूर्वी तातडीने पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (२९-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) देऊळगाव गात (ता.सेलू,जि.परभणी) या गावात देऊळगाव गात को.प.बंधारा क्रमांक १ व २ अशा दोन्ही बंधाऱ्यांचे संधानक काम पूर्ण झालेले आहेत. तसेच खोलीकरण व रुंदीकरणाचे काम सुरु असताना मे, २०२५ महिन्यामध्ये अवकाळी पाऊस पडल्यामुळे सदर खोलीकरण व रुंदीकरणाचे काम बंद करण्यात आले होते. सद्य:स्थितीत सदर काम करण्याची कार्यवाही प्राधान्याने करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती येथील नियोजित वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे जागेत बदल करणेबाबत**

**(३८) ७९५० (३०-०७-२०२५). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथे वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्याकरिता निवडण्यात आलेली जागा शहरापासून १० किलोमीटर अंतरावर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी निवड केलेल्या जागेवर मेळघाट व इतर तालुक्यातून अमरावती शहरला पूर्ण वळसा घालून जाण्याची वेळ रुग्णांवर व नातेवाईकांवर येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधीं यांनी शासनाने प्रस्तावित केलेल्या जागेत बदल करण्याबाबत मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर जागेत बदल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१०-११-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) अमरावती जिल्ह्यातील अमरावती, धामनगाव रेल्वे, चांदुर रेल्वे, नांदगांव खंडेश्वर, भातकुली, वरुड, मोर्शी व तिवसा

ह्या तालुक्यामधून येणाऱ्या रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना सदर जागेवर पोहोचण्यांकरीता सोयीचा रस्ता उपलब्ध आहे.
(३) हे खरे आहे.

शासनाने दिनांक ५.२.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मा.उपमुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीमार्फत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अमरावतीसाठी मौजे अलियाबाद, (ता.जि. अमरावती) येथील गट नं.९/१ मधील ११.२९ हे.आर (ई क्लास) इतकी सुयोग्य जागा निश्चित केली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याबाबत व भविष्य निर्वाह निधी (पीएफ) आणि ग्रॅच्युइटीची रक्कम ट्रस्टमध्ये भरण्याबाबत**

**(३९) ७९६३ (०७-१०-२०२५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना माहे मार्च, २०२५ चे वेतन अर्धेच देण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच एसटी कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी (पीएफ) व ग्रॅच्युइटीचे दोन स्वतंत्र ट्रस्ट असून ८७ हजार एसटी अधिकारी व कर्मचारी यांची पीएफची अंदाजे १ हजार २४० कोटी रुपये व ग्रॅज्युएटीची अंदाजे १ हजार १०५ कोटी रुपये इतकी रक्कम अशी मिळून अंदाजे २३४५ कोटी रुपयांची रक्कम माहे फेब्रुवारी, २०२४ पासून एसटीने दोन्ही ट्रस्ट कडे भरणा केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कर्मचाऱ्यांना त्यावरील येणाऱ्या व्याजातून सदरची रक्कम ८.२५% इतक्या दराने परत करण्यात येते परंतू गेले अनेक महिने एसटीने सदरची रक्कम गुंतवणूक केली नसल्याने त्यावरील व्याज व चक्रवाढ व्याज बुडाले असून त्याचा फटका कर्मचाऱ्यांना बसला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याबाबत व भविष्य निर्वाह निधी (पीएफ) आणि ग्रॅच्युइटीची रक्कम ट्रस्टमध्ये भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१०-१२-२०२५) :** (१) रा. प. कर्मचाऱ्यांच्या माहे मार्च देय एप्रिल २०२५ च्या वेतनासाठी शासनाने उपलब्ध करून दिलेल्या निधी द्वारे रा. प. कर्मचा-यांना अर्धा पगार देण्यात आला परंतू शासनाने पुन:श्च निधी उपलब्ध करून दिल्यानंतर रा. प. कर्मचा-यांचे उर्वरीत वेतन अदा करण्यात आले. एकुण रु. ४२५.२८ कोटी इतकी सवलतमुल्याची रक्कम उपलब्ध करून दिल्यावर रा. प. कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यात आले आहे.
(२) रा.प. महामंडळाची आर्थिक स्थिती बिकट असल्याने दैनंदिन प्राप्त होणारे प्रवासी वाहतुकीचे उत्पन्न (विविध सवलतीचे मुल्य वगळून) हे दैनंदिन इंधन तसेच इतर आवश्यक खर्चासाठी वापरण्यात येते तथापी विविध सवलतीच्या

मुल्यांच्या प्रतिपुर्तीची शासनाकडून येणे रक्कमेतून रा.प. महामडंळाचे नक्त वेतन तसेच काही कपातीची देणी अदा करण्यात येते परिणामतः एसटी कर्मचाऱ्यांचे / अधिकाऱ्यांचे माहे फेब्रुवारी देय मार्च २०२५ पर्यंत भविष्य निर्वाह निधी (पीएफ) विश्वस्त मंडळाकडे (ग्रॅच्युइटी) भरणा करण्यात आले नाही.

(३) रा.प महामंडळ हे कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेली भविष्य निर्वाह निधी वर्गणी विश्वस्त मंडळास विहीत कालावधीत वर्ग करीत नसल्यामुळे भनिनि विश्वस्त मंडळास वेळोवेळी गुंतवणूक करता आलेली नाही. यामुळे भनिनि विश्वस्त मंडळाचे व्याजाचे उत्पन्न अप्राप्त आहे. तथापि, कर्मचाऱ्यांना व्याजाचा फटका बसलेला नाही.

(४) व (५) माहे मार्च, २०२५ च्या देय वेतनापासून शासनाकडून सवलत मुल्यांच्या मागणीची पुर्ण रक्कम रा.प. महामंडळास वर्ग करण्यात येत आहे. त्यामुळे माहे मार्च २०२५ देय एप्रिल २०२५ पासुन वेतनातील भविष्य निर्वाह निधी अंशदानाची कपातीची रक्कम रा.प. महामंडळाकडून भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळास वर्ग करण्यात येत आहे. तथापी, कोणत्याही रा.प. कर्मचारी/अधिकारी यांची भविष्य निर्वाह निधी अथवा उपदान देणी, निधी अभावी प्रलंबित नाही. सदर रक्कमा भविष्य निर्वाह निधी (पीएफ) व उपदान (ग्रॅच्युइटी) विश्वस्त मंडळाच्या माध्यमातून विहीत वेळेत अदा करण्यात आलेल्या आहेत.

---

**सोयाबीनची व्यवहार्यता तपासण्यासाठी समिती स्थापन करण्याबाबत**

**(४०) ७९६९ (२४-०७-२०२५). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात हमीभावाने खरेदी करण्यात आलेल्या सोयाबीन खरेदीत गोंधळ झाल्याने यामध्ये सुधारणा करण्यासाठी मध्यप्रदेश व छत्तीसगड राज्याच्या धर्तीवर सोयाबीन खरेदी करण्याबाबतची व्यवहार्यता तपासण्यासाठी राज्य शासनाने समिती स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू समितीमध्ये अध्यक्ष, सदस्य म्हणून कोणाची नियुक्ती करण्यात आली आहे,

(३) तसेच सदरच्या समितीमार्फत दिनांक १५ मे, २०२५ रोजीपर्यंत शासनास अहवाल सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवालामध्ये कोणकोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत,

(५) उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१८-१२-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात हमीभावाने खरेदी करण्यात आलेल्या सोयाबीन खरेदीत अनियमितता झाल्यामुळे समिती नियुक्त केलेली नसून आधारभुत किंमत खरेदी अंतर्गत कडधान्य व तेलबिया खरेदीसाठी मध्यप्रदेश व छत्तीसगड या राज्यांतील शेतमाल साठवणूकीबावत तेथील वखार महामंडळांमार्फत वांधण्यात आलेल्या गोदामांतील सुविधा व त्यांचा दर्जा यांचा अभ्यास करून, राज्याच्या खरेदी प्रक्रियेच्या अनुषंगाने योग्य ते नियोजन करण्याबाबत शिफारस करण्यासाठी शासनाने दिनांक १५/०४/२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार समिती गठीत करण्यात आली होती.

(२) सदर गठीत समितीमधील नियुक्ती केलेले अध्यक्ष व सदस्य खालीलप्रमाणे.

१) श्री. कौस्तुभ दिवेगावकर (भाप्रसे), अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे- अध्यक्ष

२) श्री. दिपक तावरे (भाप्रसे), सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे- सदस्य

३) श्री. श्रीधर डुवे पाटील (भाप्रसे), व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई - सदस्य,

४) श्री. विकास रसाळ, पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे - सदस्य

५) श्री. संजय कदम, कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे - सदस्य

६) श्री. महेंद्र ढेकाणे, प्रबंधक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई - सदस्य सचिव

(३) हे खरे आहे.
सदर गठीत केलेल्या समितीस मध्यप्रदेश व छत्तीसगड येथे प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांचा अहवाल दिनांक ०४.०७.२०२५ रोजी शासनास सादर केला आहे.
(४) सदर अहवालात खरेदी प्रक्रीया राबविण्यासंदर्भात काही ठळक शिफारशी खालीलप्रमाणे आहेत:-
I. खरेदी संबंधी राज्यस्तरावर सुकाणू समिती, जिल्हास्तरीय समिती असावी. सदर समितींमार्फत खरेदी प्रक्रीयेवर नियंत्रण असावे.
II. शेतकरी नोंदणी आधार क्रमांक लिंक असावी.
III. शेतमालाचा दर्जा तपासणीसाठी खरेदी केंद्रावर सर्वेअर नियुक्त करावे.
IV. तसेच खरेदी प्रक्रीयेशी संबंधित आवश्यक बाबींसदर्भात विविध शिफारशी करण्यात आल्या आहेत.
(५) राज्यातील हमीभाव खरेदी प्रक्रीया शेतकऱ्यांसाठी अधिक सोयीची व सुलभ व्हावी तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर खरेदीमध्ये करता यावा याकरिता उपाययोजना करण्यासंदर्भात विविध निर्णय घेण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवीन अंशदायी पेन्शन योजना व उपदान/रजा रोखीकरणाबाबत**

**(४१) ७९९२ (२४-०७-२०२५). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी व त्यानंतर सेवेत आलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी वित्त विभागाच्या दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ च्या शासन निर्णयानुसार नवीन अंशदायी पेन्शन योजना लागू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेनुसार उपदान व रजा रोखीकरण लागू न करण्यात आल्यामुळे अध्यक्ष, राज्य शिक्षक संघ यांनी सचिव, शालेय शिक्षण विभाग व आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ८ मे, २०२५ रोजी व त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपदान व रजा रोखीकरणचा या योजनेत समावेश करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२७-१०-२०२५) :** (१) होय, वित्त विभागाच्या दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ च्या शासन निर्णयानुसार परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना सुरु केली आहे.
(२) व (३) या अनुषंगाने वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा- ४, दिनांक ३१ मार्च, २०२३ द्वारे परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत योजनेच्या सभासदाचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबियांना द्यावयाच्या कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्त उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा उपदान मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुषंगाने राज्यातील जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त खाजगी १००% अनुदानित प्राथमिक, माध्यमिक/उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावरील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती उपदान मंजूर करण्याबाबतचा शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्र. अंनियो-२०२३/प्र.क्र.२८/टिएनटी-६,दिनांक १४ जून, २०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सहकार सेवा संस्थेच्या कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४२) ७९९६ (२८-०७-२०२५). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात ६०१ सहकारी सेवा संस्था कार्यरत असून यातील काही संस्थांची उलाढाल पाच लाखापर्यंत असूनही सचिवांचे वेतन देण्याचीही त्यांची ऐपत नसून त्यातील बहुतांश संस्था ह्या अवसायनात जाण्याच्या स्थितीत असल्याचे दिनांक १० एप्रिल, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे काय,

(२) असल्यास, सेवा सहकारी संस्थांचा कारभार करण्यासाठी सहकार विभागाकडून कॅडर सचिव व संस्थांकडून स्वतःचा स्वतंत्र सचिव नियुक्त केला जातो, जिल्ह्यातील ६०१ संस्थापैकी विद्यमान स्थितीत सहकार विभागाचे २२ सचिव व संस्थांचे स्वतंत्र १३० सचिव कार्यरत असून त्यांना सहकार खात्याने नियुक्त केलेल्या सचिवांना बँक व संस्था यातील कर्ज वितरणातील दुराव्यापोटी मिळणाऱ्या दोन टक्के रकमेतून वेतन दिले जाते तर संस्थांच्या सचिवांना संस्था स्व:निधीतून वेतन देते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत सदर सचिवांकडे असलेल्या ४७१ संस्थांचा कारभार पाहता रिक्त जागा भरण्याबाबत व अन्य प्रकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (३१-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्हयात एकूण ६०२ सेवा सहकारी संस्था कार्यरत आहेत. सहकार कायद्यातील तरतुदीनुसार संस्था अवसायनात घेणेबाबत कार्यवाही केली जाते. सद्यस्थितीत अमरावती जिल्हयामध्ये २२ सेवा सहकारी संस्था अवयासनात असुन त्या सन २०२३ पूर्वी अवसायनात घेतलेल्या आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

जिल्हा देखरेख सहकारी संघाकडून सेवा सहकारी संस्थांवर सचिव नेमले जातात. जिल्हा देखरेख संघाच्या २२ सचिवांकडे एकूण ३१८ संस्थांचा पदभार आहे. जिल्हा देखरेख संघाच्या वेतनाच्या तीन श्रेणी आहेत. ज्या संस्थांना सचिव दिलेले आहेत त्यांचेकडून जिल्हा देखरेख संघाकडे वेतनापोटी वर्गणी जमा होते. जिल्हा बँकेने संस्थांना दिलेले कर्जाचे व्याज वसुल झाल्यानंतर व्याजाच्या दोन टक्के रक्कम वेतनासाठी जिल्हा देखरेख संघाच्या खात्यावर जमा होते. त्यातून सचिवांचा पगार दिला जातो. तसेच स्वतंत्र सचिवांच्या पगारासाठी व्याजाची दोन टक्के रक्कम संबंधित संस्थेच्या बचत खात्यात जमा केली जाते. अशा १११ सचिवांकडे २८३ संस्थांचा पदभार आहे. त्याप्रमाणे त्यांना वेतन दिले जाते.

(३) दिनांक ०५/०८/२०२५ चे शासन परीपत्रकानुसार संस्थांनी नियुक्त केलेल्या १०४ सचिवांना जिल्हा देखरेख सहकारी संघामध्ये समाविष्ट करुन घेतले आहे. त्यामुळे एकूण गटसचिवांची संख्या १०४+२२ = १२६ इतकी झाली आहे. ज्या सचिवांना दिनांक ०८/१०/२०२४ नंतर जिल्हास्तरीय समितीने मान्यता दिलेली आहे, असे ७ स्वत्रंत सचिव कार्यरत आहेत त्यांचा समावेश जिल्हा देखरेख संघामध्ये नाही त्यांचे वेतन संबंधित संस्था करीत आहेत. शासनाकडून कोणत्याही संस्थेच्या सचिव पदाची जागा भरली जात नाही तसेच वेतनही अदा केले जात नाही. मात्र सेवा सहकारी संस्थांना त्यांचा प्रशासकिय खर्च भागविण्यासाठी शासनामार्फत सक्षमीकरणाच्या माध्यमातून आर्थिक मदत केली जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दक्षिण गडचिरोलीच्या आश्रमशाळेतील सातवी व आठवीत शिकणाऱ्या**
**आदिवासी विद्यार्थीनींची शिक्षकांनी छेड काढल्याबाबत**

**(४३) ८००३ (१९-०९-२०२५). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील दक्षिण गडचिरोली भागात असलेल्या आश्रमशाळेतील सातवी व आठवीत शिकणाऱ्या दोन आदिवासी विद्यार्थीनींची दोन शिक्षकांनी दिनांक २८ मार्च, २०२५ रोजी छेड काढल्याबाबत दिनांक ८ एप्रिल, २०२५

रोजी त्यांच्याविरुद्ध विनयभंग व बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा व ॲट्रॉसिटीनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याच परिसरातील विद्यार्थीनींच्या छेडछाडीच्या आणखी तीन घटना घडल्याचे देखील त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१२-२०२५) :** (१), (२) व (३) खरे आहे.

दक्षिण गडचिरोली येथील आश्रमशाळेत शिकणाऱ्या आदिवासी विद्यार्थीनींची छेड काढल्याबाबत खालीलप्रमाणे नमूद पोलीस ठाणे येथे गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.
अ) उपपोलीस स्टेशन लाहेरी अप क्र.०१/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७५ (२), ३५१ (२) (३) सहकलम ८, १०, १२ पोक्सो, सहकलम ३ (१) (w) (i) (ii), ३, २ (va) अनुसूचित जाती अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम-१९८९, सुधारीत अधिनियम-२०१५ अन्वये दिनांक ०५.०३.२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
आ) पोलीस स्टेशन भामरागड अप क्र. १५/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७५ (२), ३५१ (२) (३) सहकलम ८, १०, १२ पोक्सो अन्वये दिनांक ११.०३.२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीविरुध्द मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.
इ) उपपोलीस स्टेशन रेपनपल्ली अप.क्र.०१/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७५ (१), ३५१ सह कलम १२ पोक्सो, सहकलम ३ (१) (w) (i) (ii), ३, (२) (va) अनुसूचित जाती अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम-१९८९, सुधारीत अधिनियम-२०१५ अन्वये दिनांक ०८.०४.२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपींविरुध्द मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जोगापूर (जि.चंद्रपूर) येथे जंगल सफारीमधील विकास कामे पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४४) ८०३४ (२०-०७-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जोगापूर (जि.चंद्रपूर) येथे जंगल सफारीची विकास कामे पूर्ण करण्यासाठी निसर्ग पर्यटन विकास (२४०६-२२९५) योजनेंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (राजूरा) यांनी मा.वने मंत्री महोदयांना दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२४-११-२०२५) :** (१) व (२) हे खरे आहे. जोगापूर (जि.चंद्रपूर ) येथे जंगल सफारीच्या विकास करण्याबाबतच्या रु.९६१.५० लक्ष इतक्या रक्कमेच्या आराखडयास सन २०२४-२५ ते २०२६-२७ या कालावधीकरीता महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांनी मंजुरी दिली आहे. त्यानुषंगाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात निसर्ग पर्यटन स्थळाचा विकास (२४०६ २२९५) या राज्य योजनेंतर्गत रु.३२९.०९ लक्ष इतके अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

**मौजा धोंडामांडवा, महाराजगुडा, भारी (ता.जिवती, जि.चंद्रपूर) येथे**
**नवीन तलाव निर्माण करणेबाबत**

**(४५) ८०४० (२३-०७-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा धोंडामांडवा, महाराजगुडा, भारी (ता.जिवती, जि.चंद्रपूर) येथे नवीन तलाव निर्माण करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी वा त्यादरम्यान जलसंपदा मंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१३-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मा. लोकप्रतिनिधींच्या निवेदनाच्या अनुषंगाने जिवती तालुक्यातील मौजा भारी (धारिगुडा) व मौजा धोंडामांडवा येथील दोन्ही प्रकल्प सर्व्हेक्षणाधीन आहे.

जिवती तालुक्यातील मौजा महाराजगुडा येथे प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता, सिंचन क्षेत्र उपलब्ध होत नसल्यामुळे नवीन सिंचन तलाव निर्माण करणे शक्य नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राजूरा (जि.चंद्रपूर) येथे निकृष्ट दर्जाचे सोयाबीन कमी दराने शेतकऱ्यांकडून**
**खरेदी करून एनसीसीफला विक्री करत असल्याबाबत**

**(४६) ८०५९ (१९-०८-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजूरा (जि.चंद्रपूर) येथे निकृष्ट दर्जाचे सोयाबीन कमी दराने शेतकऱ्यांकडून खरेदी करून एनसीसीफला विक्री करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास मा.पणन मंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१८-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे

(२) स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने कोरपणा तालुका खरेदी विक्री सहकारी संस्था कोरपणा खरेदी केंद्र राजुरा, गडचांदुर या संस्थेसकडून खुलासा मागविण्यात आला होता.

हंगाम २०२४-२५ मध्ये सोयाबीन खरेदी दरम्यान नॉन एफएक्यू सोयाबीन खरेद केल्याप्रकरणी कोरपणा तालुका खरेदी विक्री सहकारी संस्था कोरपणा खरेदी केंद्र राजुरा, गडचांदुर या संस्थेस काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्याचे संबंधित नोडल संस्थेस शासन पत्र दिनांक १५.०४.२०२५ अन्वये कळविण्यात आले आहे.

तसेच सदर खरेदी केंद्राची हंगाम २०२४-२५ मधील तुर व चना खरेदी प्रक्रियेतील नियुक्ती रद्द करण्यात आली.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा ग्रामीण मार्गांना राज्य महामार्गाचा दर्जा देण्याबाबत**

**(४७) ८०७७ (१८-०८-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा विधानसभा क्षेत्रातील ग्रामीण मार्गाना राज्य महामार्गाचा दर्जा देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी राजूरा यांनी दिनांक ५ मार्च, २०२५ रोजी प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना निवेदनद्वारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२६-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) रस्ते दर्जोन्नतीबाबतचे दिनांक२०/०७/२०१६चे शासन परिपत्रक व या संदर्भातील शासन धोरणाप्रमाणे या प्रकरणी योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्रातील जंगल क्षेत्रात वाढलेल्या अतिक्रमणापासून संरक्षण करुन अतिक्रमण झालेले जंगल क्षेत्र पुन्हा वन विभागाच्या ताब्यात घेण्याबाबत**

**(४८) ८१४९ (०८-०९-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशभरात २५ राज्य व केंद्र शासित प्रदेशात एकूण १३,००० चौ. किलोमीटरपेक्षा जास्त वनक्षेत्र अतिक्रमण झाले, तर महाराष्ट्रात ५७५ चौ.किलोमीटर जंगल क्षेत्र अतिक्रमण बाधीत झाल्याचा प्रकार दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील कोणकोणत्या जिल्हयात किती ठिकाणी किती क्षेत्र अतिक्रमित झाले आहे, याबाबत अतिक्रमण बाधीत झालेल्या जंगल क्षेत्राची पहाणी करुन त्यानुसार शासनाने अतिक्रमण काढण्याबाबत कार्यवाही केली आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन महाराष्ट्रातील जंगल क्षेत्राच्या वाढलेल्या अतिक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी तसेच अतिक्रमण झालेले जंगल क्षेत्र पुन्हा वन विभागाच्या ताब्यात घेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (०३-१२-२०२५) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्यातील माहे मार्च २०२५ अखेर वनक्षेत्रावरील अतिक्रमण ६०७५९.८६ हे.आर आढळून आले असून ते खालील प्रमाणे आहे-

अक्र वनवृत्त अतिक्रमीत क्षेत्र(हे.आर)

१ छत्रपती संभाजी नगर- ८६२३.९१

२ चंद्रपूर- ६९६९.०१

३ धुळे- २०८१७.३६

४ यवतमाळ- २१७१.१५

५ ठाणे- १९४६.५३

६ अमरावती- १९२४.०९

७ कोल्हापूर- १३९८.५८
८ नागपूर- २२५६.६३
९ पुणे- ४११.५५
१० नाशिक- ५११.२८
११ गडचिरोली- ५८८९.९८
१२ नागपूर (WL)- १५१९.४८
१३ मुंबई (WL)- ७३३२.३३
एकूण- ६१७७१.८९

वनक्षेत्रावरील अतिक्रमणाच्या अनुषंगाने भारतीय वन अधिनियम १९२७ च्या कलम २६(१)(h) व कलम ३३ (१)(c) अंतर्गत वन गुन्हा नोंद करण्यात येतो. तसेच महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ च्या कलम ५३ व ५४ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येते. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ आणि सुधारित नियम, २०१२ अंतर्गत दाखल वनहक्क दावे प्रकरणांमध्ये जिल्हास्तरीय वनहक्क समितीने दावा नाकारल्यास तद्नंतर अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात येते. अतिक्रमण काढताना महसूल विभाग, पोलीस विभाग, राज्य राखीव पोलीस दल, व वन विभाग यांच्याव्दारे संयुक्त कार्यवाही करण्यात येते. राज्यातील जंगल क्षेत्रातील अतिक्रमण रोखण्यासाठी तसेच वनक्षेत्राचे संरक्षण करण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात येत आहेत-

DGPS सर्व्हे पध्दतीचा वापर करुन बाऊंड्री पिल्लर्स व्दारे वन जमिनीचे सिमांकन करुन अतिक्रमण होण्यास प्रतिबंध करण्याची कार्यवाही करण्यात येते.

शहरी भागामध्ये संवेदनशील वनक्षेत्रामध्ये अतिक्रमण होऊ नये यासाठी वनक्षेत्राला संरक्षक भिंत बांधण्याची कार्यवाही करण्यात येते. अतिक्रमण होऊ नये यासाठी महसूल व वन विभागाचे वनक्षेत्राबाबतचे अभिलेख तपासून तफावत दूर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

क्षेत्रिय कर्मचाऱ्यांव्दारे नियमित गस्त करुन अतिक्रमण निदर्शनास येताच ते काढण्याची कारवाई करण्यात येत असते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांच्या अनुदानात वाढ करण्याबाबत

**(४९) ८१५० (०९-०७-२०२५). श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनामार्फत निराधारांना १५०० रुपयाचे अनुदान हे अत्यल्प स्वरूपाचे असून त्यानुसार निराधारांना जगणे कठीण झाल्याची बाब समोर आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याच्या महागाईत कमी अनुदानात उदरनिर्वाह चालविणेही शक्य नसल्याने त्यांच्या अनुदानात रुपये ७०००/- इतकी वाढ करण्याची मागणी समाज क्रांती आघाडी शाखा, वरोरा, यांनी मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यामध्ये जुनी पेंशन योजना लागू करण्याबाबत, ७० वर्षावरील वृध्दांना एस.टी. बसमध्ये प्रवासात १०० टक्के सुट मिळण्याबाबत, बेरोजगारांना रोजगार मिळण्याबाबत, खाजगीकरण रद्द करुन त्यांना शासकीय नोकरीत सामावून घेण्याबाबत त्याचप्रमाणे शाळा बंदचे परिपत्रक रद्द करुन शिक्षणाचे खाजगीकरण थांबविणे इ. मागण्यांबाबतचे निवेदन समाज क्रांती आघाडी, वरोरा यांनी मा.मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, चंद्रपूर, उपविभागीय अधिकारी तहसिल कार्यालय, वरोरा यांच्याकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान सादर केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सदर निवेदनाच्या अनुषंगाने उक्त मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा

करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नरहरी झिरवाळ (१४-११-२०२५) :** (१) समाज क्रांती आघाडी, शाखा वरोरा यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांना दिलेल्या निवेदनात असे नमूद केले आहे.
(२) व (३) हे खरे आहे.
(४) संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना या योजनेतील लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात विभागाच्या दिनांक ५ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयान्वये रुपये १०००/- वरुन रुपये १५००/- इतकी वाढ करण्यात आली आहे. तसेच या योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात रुपये १५००/- वरुन रुपये २५००/- इतकी वाढ विभागाच्या दिनांक १५ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आलेली असून सदर वाढ माहे, ऑक्टोंबर २०२५ पासून देण्यात येत आहे.

वित्त विभाग अधिसुचना नुसार दिनांक०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) १९८२ नियम लागू होणार नाहीत व वित्त विभागाच्या दिनांक ३१.१०.२००५ च्या शासन निर्णयान्वये शासन सेवेत दिनांक ०१.११.२००५ किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू आहे. तद्नंतर वित्त वित्त विभाग शासन निर्णय दिनांक २१.०८.२०१४ अन्वये परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना केंद्र शासनाच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत समाविष्ट केली आहे.

राज्य शासन निर्णय दिनांक २५/०२/२०१६ अन्वये कोणत्याही प्रवास सवलत योजनेमध्ये फेरफार करणे, सुधारणा करणे, सवलत बंद करणे अथवा नवीन प्रवास सवलत योजना सुरु करणे इत्यादी बाबतचे अधिकार गृह विभागास राहतील असे विहीत करण्यात आले आहे. सबब ७० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना एस.टी बसमधून प्रवासात १००% सवलत अनुज्ञेय करणे ही बाब धोरणात्मक असून शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

राज्य शासनाने दिनांक १ ऑगस्ट, २०१९ पासून शहरी व ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगारांसाठी तसेच राज्यातील होतकरु युवक-युवतींसाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) योजना सुरु केली आहे. योजनेची अंमलबजावणी पूर्णत: ऑनलाईन पद्धतीने महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभाग यांचे मार्गदर्शनाने व उद्योग संचालनालयाच्या सनियंत्रणाखाली जिल्हा उद्योग केंद्र व जिल्हा खादी व ग्रामोद्योग मंडळ यांच्यामार्फत जिल्हास्तरावर राबविण्यात येत आहे.

२० किंवा त्यापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याचा निर्णय तसेच यासंदर्भात कोणताही शासन निर्णय/शासन अधिसूचना/शासन आदेश शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत निर्गमित करण्यात आलेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात काजू बोंडावर प्रक्रिया करणाऱ्या कंपन्या सुरु करण्याबाबत

**(५०) ८२२० (०८-०९-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात काजू बीचे उत्पादन होत असून काजू बोंडावर प्रक्रिया करणारी एकही कंपनी जिल्ह्यात नसल्याने काजू बोंड वाया जात असल्याचे नुकतेच माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काजू बोंडावर प्रक्रिया करुन त्यापासून विविध उत्पादने तयार करण्याकरिता तसेच शासन काजूपासून वाईन तयार करण्यासाठी प्रोत्साहन देते त्याच धर्तीवर काजू बोंडावर प्रक्रिया करणाऱ्या कंपन्या सुरु केल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन काजू बोंडावर प्रक्रिया करणाऱ्या कंपन्या सुरु करण्याबाबत कोणती

कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (०२-०२-२०२६) :** (१) अंशत : खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना (PMFME) व मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया या योजनेअंतर्गत रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये अन्न प्रक्रिया प्रकल्प मंजुरीसाठी लक्षांक देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.